म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०७०

REFBK-0015116

6483C
981316 9
2040

निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
संदर्भ शाखा स्थळ प्रत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 45836 वि: निबंध
क्रमांक 2066 नोंद दि 9/13/69

REFBK-0015116

# गळती कुचंबणा

(शैक्षणिक लेखसंग्रह)

भाऊ मांडवकर

सेवा प्रकाशन, अमरावती

मूल्य दोन रुपये

प्रकाशन क्रमांक : १७

लेखक: भाऊ मांडवकर

प्रकाशिका: सौ. सिंधू मांडवकर
सेवा प्रकाशन
रुक्मिणीनगर–विस्तार
अमरावती (महाराष्ट्र)

सर्व हक्क: स्वाधीन

प्रथमावृत्ती: ५ डिसेंबर १९६६
मुद्रक: प्रसाद मुद्रणालय, अमरावती
मूल्य: दोन रुपये

संपूर्ण जीवन शिक्षणक्षेत्रात अर्पिलेले
आदरणीय श्री. तांदळे गुरुजी, वर्धा
यांना आदरपूर्वक अर्पण

अमरावती

५ डिसेंबर १९६६

निरनिराळया मासिकादिकांतून प्रसिद्ध झालेल्या माझ्या काही लहानमोठ्या लेखांचा हा संग्रह! शिक्षणक्षेत्रात वावरत असतांना आलेल्या अनुभवांचे व केलेल्या चिंतनाचे प्रतिबिंब त्यांत उमटलेले दिसेल. माझ्या बहुतेक लिखाणाची सुरुवात १९४८ सालापासून झाली असून तेव्हापासून तर आजतागायत लिहिलेले हे लेख सर्वच थरांतील शिक्षकांना ( आणि विद्यार्थ्यांना व अभ्यासूंनासुद्धा ) आवडतील असे वाटते.

– भाऊ मांडवकर

* * * * *

## अनुक्रम


१ मराठीचे अध्यापन आणि ग्रामीण भाषा

२ प्राथमिक शिक्षक असतांना

३ जिल्ह्याचे भूगोल

४ शाळा, घर आणि सद्गुण

५ शालेय पुस्तकांचे वाङ्मयचौर्य

६ निबंधलेखनकला

७ प्राथमिक शाळा व शब्दांची समस्या

८ जपानी मुले

९ मूलोद्योग, श्रद्धा व प्रार्थना

१० शिक्षणदृष्टी: काल, आज आणि उद्या

११ नैतिक बंधनांची चाड

१२ खेडी आणि वाचनालये

१३ सिंधी जमातीचे सणवार

१४ सौंदर्याची दृष्टी आणि स्वच्छता

१५ लंका

१६ गळती कुचंबणा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १५११६
ग्रंथ ... क्रमांक

# १ मराठीचे अध्यापन आणि ग्रामीण भाषा

'मराठीचे अध्यापन' हा आजकाल अधिक चर्चिला जाणारा विषय होऊ लागला आहे. आजच हा विषय अधिक चर्चेचा का व्हावा, हा मुख्य प्रश्न असून काही विशिष्ट परिस्थिती या प्रश्नाच्या उपस्थितीस कारण झाली की काय, हे आधी पाहिले पाहिजे.

**एकेकाळची परिस्थिती**

आजकाल खेड्यापाड्यांत शिक्षणाचा प्रसार प्रचंड वेगाने होत आहे. सर्वच जातीजमातीची मुले विद्यार्जनासाठी बहुसंख्येने पुढे येत आहेत. एकेकाळी विशिष्ट व उच्च जातीतील विद्यार्थीच बहुसंख्येने शिकत असल्यामुळे त्यांच्या ठरीव भाषेचे अध्यापन व अध्ययन एकाच पातळीवरून होत असते. अध्ययन करणारा व अध्यापन करणारा या दोघांचीही भाषा एकाच धर्तीची व पद्धतीची असल्यामुळे ग्रहण, अध्ययन आणि अध्यापन ही एखादी समस्या ठरावी असे काहीच त्यावेळी नव्हते. मराठीच्या अध्यापनात व लेखनात वापरली जाणारी ग्रांथिक भाषा हीच बव्हंश अध्यापक व अध्ययनकर्ते यांची भाषा होती आणि हे दोन्ही वर्ग विविध जातीजमातींतील प्राय: नसल्यामुळे अध्ययन–अध्यापन सुलभतेने व विनासायास होत असे.

**अनभिज्ञ अध्यापक**

मोठ्या शहरांच्या सीमा सोडून ज्ञान हे खेड्यापाड्यांच्या शिवेवर जाऊन पोहचताच शिवारातील लोकांना त्याबद्दलचे कुतुहल वाटू लागले व ह्या नवागत गोष्टीचे स्वागत करायला ते उत्सुक झाले! प्रथमतः खेड्यापाड्यांत अध्यापन करणारा वर्गही नागरी जीवनाशी संबंध असलेला असाच अधिक होता. तो खेड्यांतील बऱ्याचशा बाबींच्या बाबतींत अनभिज्ञ होता. उलट, खेड्यापाचांतील शिक्षणाचा व्याप वाढतच गेला. आज तर गावोगाव शिक्षणाचा प्रचंड पसारा पसरलेला आढळून येतो.

**ज्ञानाची मूल्यनिश्चिती**

खेड्यापाचांत पोचलेला हा शैक्षणिक व्याप माघारा फिरणारा नाही. पुढे गेलेला प्रवाह आता मागे वळावयाचा नाही. शिक्षणाचे प्रचंड पुरःसरण ही एक अपरिहार्यता आहे. अशा स्थितीत निर्माण झालेल्या एका वस्तुस्थितीचा निर्देश केला पाहिजे. स्वजातीशी व स्वतःच्या भू-भागाशी संबंधित जीवनाची व स्थितीचीच जाण आपल्याला अधिक असते आणि आपल्या समजुतीची व ज्ञानाची मूल्यनिश्चितीही आपण आपल्या जातीच्या व स्वतःच्या भूभागाच्या अनुभवांवर, अनुभूतीवर करीत असतो. भाषेच्या बाबतीतही हेच लागू असून खेड्यापाड्यांतील विद्यार्थ्यांच्या भाषेचे प्राबल्य असणे अपरिहार्य आहे. अशी मुले संख्येने विपुल आहेत. ह्या बहुसंख्य मुलांना भाषेची ग्रांथिक रूपे अवगत करणे अगदी प्रयासाचे पडते.

**मुलांवर ओझे**

केवळ ह्या अडचणीमुळे व विद्यार्थ्यांच्या बहुसंख्येच्या सोयीच्या दृष्टीने भाषेचे ग्रांथिक रूप बदलून ग्रामीण करावे काय ? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देणे आज तरी अशक्य आहे. ग्रांथिक भाषेवरच आजच्या मुद्रित जगाच्या पसारा वाढलेला व जगत असलेला दिसतो. मग ग्रामीण मुलांना ग्रांथिक भाषेचा अभ्यास कसोशीने घडविणे हाच एक पर्याय

उरतो. एका दृष्टीने त्या मुलांवर ते ओझे होते. तेव्हा, त्या मुलांवर अन्यायच नव्हे काय, असेही विचारले जाऊ शकते.

**प्रवाहिनी भाषा**

परंतु ग्रामीण विद्यार्थ्यांवर असे ओझे पडेल ही भीती बाळगण्याचे कारण नाही किंवा ग्रांथिक भाषा अशा मुलांकडून बिघडेल असेही समजण्याचे कारण नाही . भाषा ही एक प्रवाही बाब असून हा प्रवाह जनसागरातून प्रवाहित होत असतो. एकीकडे भाषेला स्थिरतेच्या बंधनांत अडकविण्याच्या प्रयत्न व्याकरणप्रिय भाषाविद करीत असतात, तर ललित लेखक व जनता भाषेला आपल्या कलाने आपल्यामागे यावयाला भाग पाडते. जनता ही भाषेला सोयीप्रमाणे बदलवीत जाते व ललित लेखक जनभाषेला अधिकात अधिक निष्ठावंत राहून तिला स्वतःच्या लेखनात आणण्याचा प्रयत्न करीत असतो. निबंधादिकांमध्ये वापरलेली भाषा व ललित लेखनातील भाषा यांत ग्रंथांतरी भेद आढळतो. भाषा प्रवाहिनी असून तिचा कल परिवर्तनाकडे असल्याची ती खूण आहे. 'किनई' हे रूप आजकाल ग्रांथिक समजले गेले आहे. 'की नाही' हे शुद्ध रूप सोडून 'किनई' केले गेलेच की नाही? 'किनई' आज चूक ठरत नाही. जनताच अशी भाषा घडवीत जाते. लेखक ती लेखनात आणतो व ते लेखन अभ्यासात समाविष्ट झाल्यावर विद्यार्थी त्या भाषेचा शुद्ध म्हणूनच अभ्यास करतो.

**ग्रांथिक भाषेचा कल**

तसे पाहिले तर ग्रांथिक भाषा तरी एकाच साच्याची नेहमीसाठी कुठे राहते ? ज्ञानेशांची भाषा एकनाथांच्या वेळी बदलत्या रूपावर गेली. तुकारामाची भाषा पंततंतकाळी जुनी झाली. लोकहितवादींच्या वेळची 'त्यांही' 'त्यांणी' अशी रूपे चिपळूणकरांनी मागे टाकली. चिपळूणकर, आगरकर ह्यांनी मराठी भाषेला जे गुरुत्व प्राप्त करून दिले, त्याला मराठीत तोड नाही, हे मान्य करूनही आज चिपळूणकरी थाटाचा लांब पल्ल्याची भाषा बहुलतेने आढळते काय ? आज मराठीचा कल

लहानलहान वाक्यांच्या सुबोध रचनेकडे वळलेला आहे. आजची भाषा ही अशी सुलभतेकडे जात आहे. कठीण व दुर्बोध मानल्या गेलेल्या नवकाव्यातही सारी शब्दरचना सोपीच असते. खुद्द जनताच या सुलभीकरणाला फार मदत करीत असते. नवेनवे गरजू शब्द घडवून ते रूढ करण्यातही जनतेचाच हात अधिक असतो. नव्या पैशासाठी 'खडकू' हा शब्द जनतेनेच स्वतःच्या बुद्धीने तयार केलाच की नाही ? भाषा ही जनतेची स्वयंनिर्मिती आहे हाच याचा अर्थ !

तेव्हा, जेथे ग्रांथिक भाषेलाच स्थिरता नाही, तेथे ही ग्रांथिक भाषा बिघडेल, या शंकेला जागा वा अर्थ उरत नाही. राजसिंहासनावरून खाली उतरून प्रजेजवळ जाणारा लोकराजा आज प्रिय होऊ शकतो. ग्रांथिक भाषासुद्धा सुलभ होऊन जनमनात बसू लागल्यास ती आणखी लोकप्रिय होईल !

**प्रामाणिक प्रयत्न**

परंतु, या प्रक्रियेमुळे ग्रंथभाषा अगदीच ग्रामीण झाली तर ती अगदीच विकृत होईल अशी भीती मुख्यतः व्यक्त करण्यात येते, तिचे काय ? मला वाटते, ही पण भीती व्यर्थ आहे. आपण रंगवतो तेवढे हे चित्र भयानक निश्चितच नाही. ग्रामीणांनासुद्धा आपल्या भाषेत 'चुका' असतात ह्याची जाणीव असते व ते लोक 'शुद्ध' बोलण्याची प्रामाणिक धडपड करतात. निदान शिक्षित जनांशी बोलतांना तरी ही धडपड दिसून येते. ग्रामीण माणूस ज्या शब्दाचा उच्चार 'इचार' असा करतो, त्याला शिक्षित माणूस 'विचार' म्हणतो हे लक्षात येताच तो ग्रामीण माणूस 'इच्छा' या शब्दाचा उच्चार 'विच्छा' असा करू लागतो; 'तूप'चे 'तूम्प' असे उच्चारण तो करतो. या उच्चारणांचा अर्थ हा की, हा ग्रामीण समाज ग्रांथिक भाषेच्या जवळ येण्यासाठी प्रामाणिकपणे धडपडतो ! तेव्हा, रोजरोज वाचून-ऐकून असलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांना ग्रांथिक व शुध्द भाषा आपल्याला येऊ नये असे कसे वाटेल ? त्यांचाही प्रयत्न ती भाषा आत्मसात करण्याचा असतो.

## काही चपखल शब्द

हे जरी खरे असले तरी, ग्रांथिक भाषेत ही ग्रामीण मुले कमी पडतात हे मात्र सत्य आहे. गावांमध्ये राहत असलेल्या बहुतेक जाती-जमाती ह्या बहुजनसमाजाच्या आहेत. ह्या मुलांना ग्रांथिक भाषा आत्मसात करण्यासाठी कष्ट पडतात; ते त्यांनी करावेत; हे मान्य करूनही एक गोष्ट सांगावीशी वाटते, ती ही की, ग्रामीणांना जवळचे वाटणारे काही योग्य व ग्रांथिक भाषेत चपखल बसू शकणारे गरजू शब्द अभ्यासक्रमात समाविष्ट करून घेणे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय ह्या ग्रामीण-मुलांच्या ग्रहणाची, आकलनाची व ज्ञानार्जनाची क्षमता व शक्ती वाढणार नाही. 'मले,' 'तुले,' 'माका,' 'तुका' यांसारखी रूपे ग्रामीणांना कितीही प्रिय असली तरी ती अध्ययन–अध्यापनात येण्याची आवश्यकता आज तरी प्रतिपादिता येणार नाही. मात्र ग्रामीणांच्या जीवनातील अनंत 'शुद्ध' शब्द, जे शहरी जीवन जगणाऱ्यांच्या व नागरी संस्कृतीच्या बहुधा कक्षेत येत नाहीत, त्यांचा समावेश ग्रांथिक भाषेत व अभ्यासक्रमात मानाने करून घेतला गेला पाहिजे. उदाहरणांनी ही गोष्ट स्पष्ट करता येईल. कृषिउत्पादन ही आजची देशाची मुख्य गरज मुलांना पटवून देण्यासाठी कोणताही मोघम 'उपदेश' मुलांना 'आपला' वाटण्यास अडचण जाईल. आधीच बोध नकोसा असतो व तोही मोघम! त्यामुळे तो प्रभावी ठरणे अशक्यच! ह्या विषयाचे महात्म्य त्यामुळे मुलांना नीट कळावयाचे नाही. कृषिजीवनाचे संपूर्ण चित्रच त्यासाठी मुलांच्या डोळ्यांसमोर उभे करावे लागेल. ते करीत असताना साजुनी, पावशा, वखर, नांगर, तिफण, येली, दुंड्या, सारण्या, तास, सरते, लांडगा, डवरा, जाळे, दांडकड्या, पास, फाळ, सीतादेवी, चाडे, निंदण, खुरपण, मांगलणी, कोळपणी, फड, फडावरचा कोंबडा, तुरीच्या पेट्या, खांड, मुट्ठण, मदन, रासुंडा, शेलपेंडी, मेंडाळी, पात, खळे, भट्टे, तिवा, उफण, मेढ, डाले, वण, शेणोड्या, पावझाडी, नट्टुरा, गंथडी, डुकरी, वाणी, हुरडा, आमनेर, कान्ही, गेरवा, मातीरा, आयते, मेंगी, सर्वा असे कितीतरी शब्द आणून कृषिउत्पादनाच्या महत्त्वाचा तो पाठ सजवावा लागेल. हे

शब्द वगळले तर त्या प्रतिपाद्य विषयाचा प्राणच नष्ट होतो. या शब्दांची व विषयांची माहिती मूठभरांच्या नागरी भाषेला नाही म्हणून ही भाषा 'अशुद्ध' ठरत नाही.

**प्रादेशिकत्वाची अपरिहार्यता**

अशा भाषेचे प्रादेशिकत्व मान्य केले व एका भागापुरतीच ही माहिती होईल, असा आक्षेप आला, तरीही बिघडत नाही. तेवढ्या भागापुरते तरी त्या विषयाचे सखोल ज्ञान मुलांना मिळेल. आणि संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांना सर्वच विषयांचे धडे समान तऱ्हेने देता येतील हे तरी नेहमी शक्य आहे काय ? दक्षिणेतील 'आळवार' संतांची माहिती भारतातील सर्वच विद्यार्थ्यांना असावी, काही अंशी उच्च शिक्षणात त्यांची माहिती व्हावी हे मान्य केले तरी दक्षिणेतर भागातील लोकांना 'आळवार' संतांच्या माहितीचे आवाहन आत्मत्वाने कितपत होईल ? त्या त्या भागाचा विशेष म्हणून फार तर त्यांचा अभ्यास होईल व तो मुलाचे वयोगट विभागून ठेवताही येईल. कोकणातील भातशेती व भंडाऱ्याकडील भातशेती यांत फरक आहे. उत्पादन, जमीन व पद्धती अशा बाबतीत हा फरक आहे. वऱ्हाडच्या शेतीत झाडांच्या बोंडांना कापूस येतो याचे महदाश्चर्य कोकणच्या असंख्य लोकांना आजही वाटते. वऱ्हाडचा पोळा पश्चिमेला काहीसा माहीत आहे व तिकडची 'मलरी' वऱ्हाडला ठाऊकच नाही. तरीही अभ्यासात दोहोंचे पाठ आहेत व असावेत. कोकण भागातील वैशिष्ट्यांचे धडे नावीन्य व अभ्यास म्हणून काही वर्गांमध्ये अभ्यासता येणे कठीण नाही. हेच वऱ्हाडच्या, खानदेशाच्या वा इतर भागांच्या बाबतीत म्हणता येईल.

**शब्दसंपदा वाढेल**

ह्या सर्वांचा अर्थ हा की ग्रामीण म्हणून ग्रामीणांच्या सर्वच शब्दांना दूर करणे अशक्य असून त्यांतील चपखल बसणाऱ्या व योग्य अशा शब्दांना जवळ करून ग्रांथिक भाषा सजविण्याचा आज काळ आलेला आहे. त्यामुळे भाषा बिघडण्याची भीती नसून उलट साचेबंद-

पणातून तिची सुटका होईल. भाषेचा साचेबंदपणा आजवर कधीच टिकला नाही. उलट, ग्रामीण शब्दांच्या आवश्यक वापरामुळे ग्रांथिक भाषेला कमीपणा न येता ती अधिक समृद्ध होईल. ग्रंथांमधील अनेक विषय व विभाग, झाडे, बने इत्यादिकांबाबत नागरी भाषा आणि नागरी समाज अजून अज्ञ आहे. मधाच्या पोळयाचा 'आगेमोहोळ'साराखा एखादाच प्रकार नागरी जनांना फार तर ज्ञात असू शकेल. पण ग्रामीण जीवनात झाडेमोहोळ, आगेमोहोळ, कोतेमोहोळ, सातपुडेमोहळ असे मधपोळयांचे चार प्रकार विविध शब्दांसह माहीत आहेत. ही शब्दसंपदा भाषाभिवृद्धी-साठी पूरक व पोषक ठरणारी आहे. अनेक वनस्पती, भाज्या, वेल, झाडे यांच्या विविध नावांची माहिती नागरी समाजास नसतांना त्यांच्या नावांशी 'ग्रामीण' म्हणून वाकडेपणा साधण्यात काय अर्थ आहे ? मराठीला इंग्रजीबरोबर यायचे तर तिला १५ लाख शब्दांची आणखीच गरज आहे. इंग्रजीत २० लाख तर मराठीत ५ लाख शब्द आहेत. हिंदीत ते केवळ पावणेदोन लाख आहेत. वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र ह्यासारख्या विषयांमध्ये परक्या नावांवर अवलंबून राहण्याची पाळी येते. भारतातील जनभाषा यासारख्या शास्त्रांना बरीचशी शब्दसंपदा पुरवू शकेल व भाषांची शब्दसंपदा विपुल होईल, यात शंका नको !

तेव्हा, ग्रामीण जीवनातील काही शब्दांना स्वीकृत करून उद्याचे अध्यापन होऊ लागले तर त्यात गैर काहीच होणार नाही. ग्रांथिक भाषेच्या मर्यादा न ओलांडतासुद्धा हे करता येणे शक्य आहे. ग्रांथिक भाषा व बोली यांच्या एकांगी समर्थकांचा आग्रहीपणा केवळ आग्रहासाठी त्यांनी कायम ठेवला तर वेगळे ! पण दोहोंचा दुवा साधता येणे अशक्य नाही !

शेवटी संक्षेपत: असे म्हणता येईल की, ग्रामीण शिक्षणात मराठीचे अध्यापन करतांना ग्रांथिक भाषा व ग्रामीण भाषा ह्यासंबंधी अडचणी नेहमीच निर्माण होतात. ह्या बाबतीत ग्रांथिक भाषेचा इतिहास पाहिला तर ह्या भाषेने जनभाषेचा समावेश आपल्यात वेळोवेळी करून घेतलेला आढळतो. हीच दृष्टी हल्ली भासत असलेल्या समस्येचा बाबतीत ठेवली तर ही समस्या सुटू शकेल !

* * * * *

# २ प्राथमिक शिक्षक असतांना

नागपूर महापालिकेच्या शिक्षण-विभागात, दि. १७-९-१९५१ ते २७-७-१९५५ पर्यंत मी प्राथमिक शिक्षकाची नोकरी केली. या उण्यापुऱ्या चार वर्षांच्या अवधीत, अनेक बरेवाईट अनुभव येऊन गेले. प्रतिक्षणी नवीन अनुभवांची भर पडे. त्यातल्या वाईटांची उजळणी येथे नको. परंतु ज्या काही गोड आठवणी माझ्या स्मृतीत आहेत, त्यातल्या काही येथे दिल्यास माझ्या शिक्षकबंधूंना त्या खचित आवडतील व त्यातूनही त्यांना काहीतरी मिळेलच !

[१]

"घ्या सर !'

सुरुवातीला मेहदीबाग शाळेत अर्ध्या दिवसासाठी जावे लागे. सुटाबुटात वावरण्याची सवय असल्यामुळे व माझी कोरी करकरीत नवी सायकल दिसल्यामुळे, मुलांनी नवे गुरुजी 'श्रीमंत' असल्याचा अंदाज आधीच बांधून टाकला असावा. एकदोन दिवसानंतरच, माझ्याहून फार तर १-२ वर्षांनी लहान असलेला एक विद्यार्थी, मी खुर्चीवर बसताच समोर आला. त्याने आपल्या खिशात हात घातला व 'पासिंग शो' माझ्यासमोर धरून म्हणाला– "घ्या सर !"

मला हे नवीन होते. मी डोके खाजवले. चेहरा आंबट केला. कपाळाला आठया चढवल्या अन् उत्तर दिले, "नको ! मी ओढत नसतो." नव्याने येणारा शिक्षक या प्रकाराने स्तंभित होणारच. माझे सरोष आश्चर्य पराकोटीला जाऊ नये म्हणूनच की काय त्या मुलाने माझ्या डोक्यात प्रकाश पाडला– " पहिले गुरुजी तर रोज घेत होते सर ! "

—मुलांवर सुसंस्कार करणाऱ्या सूज्ञ शिक्षकांनी काय शिकायचे ते शिकावे; परतु मी मात्र त्यानंतर चालू वर्गात पानसुपारी देखील न खाण्याचे धोरण पाळायाचा प्रयत्न केला.

(२)

**मुलगाच बापाचा गुरू !**

महाल शाळेत असतांना एक मुलगा उशीरा आला. मी स्वतः बहुधा वेळेवर जाण्याची सवय लावून घेतल्यामुळे, मला अर्थातच हा उशीर खपत नसे. मी 'पुस्तकी पद्धती'त वर्णिलेल्या धोरणाप्रमाणे त्या मुलास 'शारीरिक शिक्षा' न करता उभे केले व अद्दल घडवून मुलात परिवर्तन करण्याचे शिक्षकाचे कर्तव्य पार पाडल्याचे समाधान मानून घेतले ! पण हेही समाधान अस्मादिकाला लाभले नाही. दुसऱ्या दिवशी त्या मुलाचे श्रीमंत पालक आले व त्यांनी या शिक्षेचा निषेध केला. समर्थन ऐकायची स्वारीची तयारी दिसली नाही. तरातरा बोलून मंडळी परतली. एका शिक्षक-मित्राने त्या मुलाकडे दुर्लक्ष करून त्याला सुटी देत जावी, कामाला बाहेर पाठवीत जावे व तेणेकरून त्याला अनुत्तीर्ण करून त्याच्या बापाला अद्दल घडवावी असा (वद –) सल्ला दिला. मी मात्र त्या मुलाकडे त्या दिवसापासून जास्त लक्ष दिले. परिणाम असा झाला की, ह्या चांगुलपणाला इजा होऊ नये म्हणूनच की काय त्या मुलाने आपल्या पालकांना शाळेत यायची त्यानंतर खरोखरी बंदी केली. तिसरीतला, तो बापाचा गुरू झालेला मुलगा, अजूनही भेटून ती आठवण काढतो.

—— आपल्या चांगुलपणाने शिक्षक मुलांना प्रिय झाला, तर तो पालकांनाही प्रिय का होणार नाही ?

(३)

**अनाथालयात रामाची सीता**

अनाथालय शाळेत असतांना संस्थेतील शिकणाऱ्या मुलांतली भांडणे ऐकायला मिळत. एकदा दोघ्या मुलींची भांडणे विकोपास जाऊन म्हणे एकीने विहिरीवर जीव देण्याचाच प्रयत्न केला. तिची ती गंमत होती की काय ते मला कळले नाही. पण खरे समजून मी नंतर वर्गातून शिकवतांना अनाथालयाचा संबंध वाल्मिकीच्या आश्रमापर्यंत पोहचवला व 'सीता' ह्या अनाथ जिवाची कथा सांगितली. मुलांत उत्साह संचरला व अनाथालयातली मुले आशेने ती गोष्ट ऐकती झाली.

—त्या दिवशी मला वाटले, शिक्षकांना अशा जुन्या गोष्टींना कालस्थित्यनुरूप वळण देऊन आशा, उत्साह व नवचैतन्य ह्या नव्या कोमल जिवांत ओतता येणार नाही काय ?

(४)

**जातीचे भूत**

जातीचेही असेच ! घटनेने जाती नष्ट करण्याचा काही ठराविक वर्षांत घाट बांधला असला तरी कागदोपत्री अजून जातीचा खाना नष्ट होत नाही हे मला खटकत असे. रोजच्या हाजरीवर तरी मला तो खाना अनावश्यक वाटे. ठेवलाही तरी शिक्षकाने तो वाचू नये व तसा उल्लेख करू नये असा मी दंडक घातला. हरिजनांची अधिक संख्या असलेल्या श्रद्धानंद शाळेतील बहुतेक मुलांवर ह्या गोष्टीचे चांगले संस्कार उमटल्याचा माझा अनुभव आहे. असेच काहीसे अनुभव मला दाजी, गंजीपेठ, शुक्रवारी इ. शाळांत काम करतांनासुद्धा आले.

— जातिभेद नष्ट करण्याचे विचार जुन्या खोडांना सांगण्यापेक्षा ह्या कोमल वृत्तीच्या बालकांच्या मनांतच ती विष-बीजे मूळ धरणार नाहीत यासाठी जपले तर ?

(५)

**रडके मास्तर**

दुसरीला शिकवीत असतांना एकदा मधेच काम आले. मुलांना 'बे एक बे' चे पाढे लिहायला लावून, मी टेबलावरील कागद रेघाटू लागलो. अशी कामे मधे येणे वाईट! ती अन्य वेळी करणेही शिक्षकांवर अन्यायच! मला वाटते, निदान अशी कामे वर्गाच्याच वेळात केली तरी त्यामुळे मुलांवर दुर्लक्ष होऊ नये. माझे मात्र दुर्लक्ष झाले. काम तातडीचे होते. शिवाय शिकवतांना मध्येच आले. मुलांत गडबड झाली. मी उठलो. स्केलपट्टी घेतली आणि विनाकारण मधल्याच निरापराध मुलाला दोन छडया मारल्या. 'पद्धती'ने गाशा गुंडाळला. 'शिक्षे'चे पाठ प्रशिक्षण-शाळेत मिळाले त्यांचा उपयोग होत नसतो हे मलाही ठावे आहे! पण 'शिक्षे'च्या कल्पनांचा दुरुपयोग होतो, ह्याचा अनुभव नव्हता!

सपासप --- दुसऱ्या वेळी छडी तुटली. पांजऱ्याची पट्टी ती काय? --- पण त्या कोवळ्या हातांना तिने वळ आणले. बिचारा मुलगा! मास्तरांच्या रागाने त्याच्या आसवांना वाट मिळाली!

तुटलेले तुकडे! ते कुणीसे जमवले. पण मला त्या निरपराध मुलाकडे पाहवले नाही. दुसऱ्याच क्षणी माझ्या डोळ्यां पाणी तरळले. मुलांना दिसू नये म्हणून रुमाल डोळ्यांना लावला. पण श्रध्दानंद शाळेतल्या त्या ग्रामीण भागातील निर्व्याज मुलांनी, मास्तर खुशीत असतांना नंतर छेडलेच, "सर रडके आहेत!" त्यानंतर हातात छडी वा पट्टी घेण्याची--रागाच्या भरातसुद्धा--मला हिंमत झाली नाही.

---असेही प्रसंग कधीकधी मुलांच्या व शिक्षकांच्या जीवनाच्या चाकोऱ्या घडवीत असतात. आपल्या संस्कारक्षम भावनात्मक मनाला धुंडाळण्याचा प्रयत्न शिक्षकबंधूंनी करीत राहणे इष्ट होईल, नाही का?

( ६ )

## उपाशा पोटी शाळा (?)

नोकरी सोडण्याच्या एकदोन महिने अगोदर 'सक्ती' म्हणून 'शिशुगणने' चे काम आले. उन्हाळ्यात हे काम केले. एके दिवशी माझे एक शिक्षकमित्र व मी, कानांना दस्त्या बांधून भर उन्हात दुपारी तीन वाजता अंबाझरी नाक्याजवळील 'बागा'त गेलो. संत्री मिळाली. झाडांच्या सावलीत बैठक मारली. झोपडीतील इसमाला 'सक्ती'ची योजना प्रेमाने कथन केली. ऐकणारा इसम अडाणी होता. त्याला कायद्याची भीती होती. त्याला ८-९ वर्षांची एकटीच मुलगी होती. घरी लहान बहिणीला सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर होती. शिवाय गेल्या २–३ वर्षांपासून मालकाच्या 'बागा'ची तीच राखण करी. आमची योजना ऐकून त्या मुलीच्या बापाला पेच पडला. तो म्हणाला, "पोरीला शिकायला घाडून रोजी बुडवू ? घरात कुणी नाही. मी घर पाहणं म्हणजे पोटात विस्तव घालून जगायचं!" त्याला जास्तीची रोजी मिळत नव्हती. बापलेकीच्या रोजमजुरीशिवाय दुसरे कोणतेच उत्पन्न नव्हते. त्याने शेवटी प्रश्न केला, " सरकारनं याचा विचार केला का ? आमचं पोट जळेल तेव्हा शिक्षणाचा फायदा! उपाशा पोटी शिकायला तुमची 'मुंगशी-पालटी' सांगते काय? "

–ह्या अशा अनुभवांचे उत्तर 'मुंगशीपालटी' किंवा सरकार यांच्याजवळ आहे काय? या समस्येचे निराकरण करण्याचा विचार त्यांच्याकडून केव्हा होणार? सक्ति–शिक्षणातील हीसुद्धा एक समस्याच आहे हे नाकारता येणार नाही.

( ७ )

## स्मृतींतील समाधान

श्रध्दानंदपेठ शाळेत मुलेमुली एकत्र शिकतात. मुलींची संख्याही फार मोठी असते. वर्गात एक मुलगी अभ्यासात फार मागे होती. कशीतरी पहिलीतून उत्तीर्ण झाली होती. माझ्या वर्गात मी मात्र तिच्या-

मधे काही नवीन पाहिले. मागासली म्हणून गांजली व म्हणून तीच जास्त माझ्या लक्षात राहिली. तसे पाहिले तर मागासली म्हणूनच ती मागे टाकली गेली असली पाहिजे. एरवी तिची उत्तरे मोठी गमतीदार असत. वर्गात ती कोणत्याही प्रश्नाचे उत्तर तिला जमे तसे देई. हास्यास्पद ठरली तरी तिला वाईट वाटेना. हरिजनकुटुंबातील त्या मुलीला भावना कळत होत्या. पण त्या व्यक्त करणारी तिची 'भाषा शिक्षकी दृष्टीला खटकत असावी. मी तिला चुचकारून तयार करू लागलो. का कोण जाणे तिच्यात कमालीचा बदल झाला. दुसरीच्या परीक्षेत ती पहिली आली. मागच्यांना घेऊन चालणारी शिक्षकाची वृत्ती काय करू शकते याचे प्रत्यंतर आले. माझ्या बी. ए. च्या परीक्षेच्या पहिल्या दिवशी त्या बालिकेने आपल्या इवल्याइवल्या हातांतील मोगऱ्याची फुले 'राजकमल'च्या आरंभीच्या परीप्रमाणे माझ्या टेबलावर सोडली ! तो प्रसंग किंवा नोकरी सोडल्यानंतर ' आपले सर गेल्यामुळे तिला आलेला ४–६ दिवसांचा आजार ' ह्या दोन्ही गोष्टी माझ्या स्मृतींत नेहमी ताज्या राहतील !

—प्राथमिक शिक्षकांच्या जीवनात ज्या कोमल कळ्यांनाच प्राधान्य आहे, त्यांच्या दृष्टीने तरी आपण यशस्वी ठरलो याचे मला समाधान वाटते. नाहीतरी शिक्षकांच्या जीवनात या निर्व्याज समाधाना-शिवाय आनंददायी असे दुसरे काय असू शकते ?

* * * * *

# ३ जिल्ह्याचे भूगोल

सध्या आपल्या भागात चालू असलेल्या शिक्षणपद्धतीनुसार तिसऱ्या वर्गाच्या भूगोलाच्या अभ्यासक्रमात जिल्ह्याचा भूगोल ठेवलेला आहे. प्राथमिक शाळेच्या तिसऱ्या वर्गात आपापल्या जिल्ह्याचा भूगोल शिकण्यासाठी विद्यार्थी जिल्ह्याच्या भूगोलग्रंथाचा अभ्यास करतात व शिक्षक त्या ' ग्रथावरून विद्यार्थ्यांकडून त्या जिल्ह्याचा अभ्यास करवून घेतात.

भूगोल म्हणजे ' भू-गोला 'चे ज्ञान ! भूगोल म्हणजे सृष्टीतील दृश्य वस्तूंचे स्पष्ट दर्शन ! भूगोल म्हणजे भूतलावर जे आहे त्याचे खरे-खुरे निरीक्षण व निरीक्षणात्मक ज्ञान ! हे ज्ञान विद्यार्थ्यांना अल्पवयात पचनी पाडायचे असते आणि कोमल व लवचिक बुद्धीच्या मुलांच्या ते चांगले पचनी पडतेदेखील ! इतकेच नव्हे तर पचनी पडलेले ते ज्ञान विद्यार्थ्यांच्या उत्तरवयात आपला संस्कारात्मक अमल गाजवीत असते. शाळेत शिकलेल्या बहुतेक गोष्टींच्या स्पष्ट व जशाच्या तशा आकृत्या मनावर उमटतात व व्यावहारिक जीवनात पुढे त्या उपयोगास येतात. भूगोलाच्या ज्ञानाच्या बाबतीत ह्या गोष्टी अधिक लागू पडतात. ह्या गोष्टींचे व भूगोलाचे नाते अधिक जवळचे आहे. भूमीवर कोठे, काय,

कसे आहे हे शाळेत शिकविले जाते. पुढील वयात त्या गोष्टीचा प्रत्यक्ष संबंध येतो व त्याचे पडताळे दिसतात.

अर्थात यावरून दिसून येईल की शाळेत शिकावयाचा भूगोल जो विद्यार्थ्यांना जीवनविषयक निकटवर्ती दृष्टिकोनातून पचचावयास द्यावयाचा असतो - तो अगदी खरा असावयाला पाहिजे. जी गोष्ट भूगोलात वाचली, अभ्यासली व तसे अमक्या अमक्या ठिकाणी आहे असे एकदा मनावर ठसले, पण प्रत्यक्षात अनुभव निराळा आला तर ' भूगोल' शब्दाला शालेय शिक्षणात कवडीचीही किंमत न राहता हा विषय पूर्णपणे 'गोल' होऊन जाईल !

मला या ठिकाणी बाकीच्या वर्गाच्या भूगोलासंबंधी कांही लिहावयाचे नाही. फक्त जिल्हयाच्या भूगोलाबद्दलच विचार प्रस्तुत करावयाचे आहेत. वर जे विचार उपस्थित केले आहेत; त्यांच्या निकषांवर जिल्हयांच्या आजच्या भूगोल–पुस्तिका पारखून पाहिल्या तर भारी निराशा पदरी पडण्याचा प्रसंग येतो. ज्यावेळी अगदी पहिल्यांदा जिल्हयाचे भूगोल तयार केले गेले असतील त्यावेळी ती गोष्ट प्रशंसनीय ठरली असेल. पहिला प्रयत्न म्हणून 'स्तुत्य तथा अभिनंदनीय' असा शेरा द्यायलाही आज हरकत नाही. पहिल्याप्रथम भूगोल तयार करणाऱ्यांचे परिश्रमही डोळयांआड करता यायचे नाहीत. त्यामुळे कदाचित नाणावलेले म्हणून आज ज्यांच्याकडे अंगुलिनिर्देश केला जातो ते भूगोललेखक ख्यातिपावले असतील.

परंतु एखादी गोष्ट बाबाआदमच्या जगात श्रेष्ठ ठरली जाईल वा जावी असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही आणि बाबा आदमची मिरासदारी नित्यासाठी चालू असावी असा अट्टाहास धरणेही अर्थात युक्त होईल असे वाटत नाही.

आज आपल्याकडे प्रत्येक जिल्ह्याचे जे भूगोल–पुस्तक आहे, ते माहितीच्या दृष्टीने अपुरे आहे असे म्हणता आले नाही तरी ते

बरोबर नाही आणि योग्यही नाही असे म्हणणे मुळीच गैर होणार नाही. सरकारी कागदपत्रांच्या आधारे कधीकाळी मिळविलेल्या माहितीला गोळा करून तिला भूगोल–पुस्तकात नमूद करावी व त्या छापील कपट्यांवरून "आहे तसे राहू द्या, आपल्याला काय? लेखकालाच केव्हाही जास्त माहीत; पुस्तकातले चुकीचे म्हणावे तरी कसे ?" असे म्हणणाऱ्या अनुकरणप्रिय व परिस्थितीने पिचलेल्या शिक्षकांनी मुलांना शिकवीत सुटावे असाच प्रकाच सर्रास सुरू आहे. हे डोळ्यांआड न होऊ शकणारे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट सत्य असूनही अजून झाकूनच आहे हेही अेक कटू सत्यच आहे ! ह्यामुळे हजारो विद्यार्थ्यांची मोठी दिशाभूल होते ह्याची दखल मात्र पालक, शिक्षक, शिक्षणाधिकारी व प्रत्यक्ष भूगोलाचे पुस्तक–लेखक देखील घेत नाहीत. या अक्षम्य दोषांचे खापर जास्तीत जास्त प्रमाणात पुस्तक–लेखकाच्या डोक्यावरच फोडणे इष्ट होईल ! मोठ्या शहरात राहून साऱ्या प्रांताचे जिल्हे चार भिंतींच्या आत बसून आपल्या 'लेखक–चक्षूं'नी पाहणारे भूगोल–लेखक प्रत्येक जिल्ह्याचे भूगोल कितपत चांगले लिहू शकतील हा प्रश्नच आहे ! कित्येकदा बोलले जाते की, "अमक्या अमक्या प्रसिद्ध भूगोल–लेखकाने यंदाच्या आवृत्तीत बराच बदल केला, मग तो भूगोल वाईट कसा ?" असे म्हणणारांना सांगावेसे वाटते की, तुम्ही ज्यांची स्तुती करता त्यांनी आपल्या भूगोलाच्या नवीन आवृत्तीत नवीन प्रश्न घालणे ( बहुधा नुकत्याच होऊन गेलेल्या परीक्षांत आलेले असायचे ते ! ) व किंचित इथला तिथे बदल करणे ह्यालाच का उचित बदल म्हणायचे ? अशा तऱ्हेचे मूळ मुद्याला व योग्य माहिती पुरविण्याला हात न घालणारे किरकोळ बदल म्हणजे नवीनपणाचा बुरखा घेतलेला जुनाच सांगाडा 'आम्हा जनां'पुढे ठेवण्यासारखे नव्हे काय ?

असो काही ते ! उदाहरणादाखलही बरेच सांगता येण्यासारखे आहे. मी येथे काही गोष्टी यवतमाळ जिल्ह्याच्या बाबतीत सांगू शकेन. माझी मूळ वस्ती यवतमाळ जिल्ह्यातील असल्यामुळे मी याविषयी लिहीत आहे. विस्तृतपणे येथे लिहायचे मुद्दाम टाळतो.

ग्रंथ शाखा

यवतमाळ जिल्ह्याच्या माहितीवर दोनतीन पुस्तके असल्याचे माझ्या पाहण्यात आले. अेक पुस्तक नकाशे व माहितीच्या दृष्टीने सकृदर्शनी थोडे बरे वाटते तर दुसरे पहिल्यावरून तयार केल्याची शंका येते. असे असूनही ते बाजारात कमी किमतीने खपविण्यासाठी धूळफेक करून फेकलेले भाकरीच्या तुकड्यागत असलेले भिकार चोपडे भासते ! एका 'नवीन' पुस्तकात यवतमाळ जिल्ह्याची लोकसंख्या १९५१ मध्ये नऊ लाख असूनही ती एक लाखावर आणावी ( बाकीचे आठ लाख लोक मेले की काय, न कळे ! ) व आमच्या शिक्षकांनी ते खुशाल शिकवावे ह्याचे सखेदाश्चर्य वाटते. ज्या भूगोल-पुस्तकाची व त्याच्या लेखकवर्यांची स्तुती सर्वत्र 'विषय-पटू' म्हणून केली जाते ते तरी पुस्तक कितपत चांगले आहे ह्याची छानबीन करायला गेल्यास मोठी निराशाच पदरी पडते. त्यातूनही भरससाट चुकांचे पीक अतोनात आलेले आढळून येते. पुसद-दारव्हा रेल्वे दुसऱ्या युद्धकाळात काढून टाकण्याला कित्येक वर्षे होऊन गेली तरी विद्यार्थ्यांनी तेच ते घोकावे व दारव्हा जंक्शन नसूनही आहे असे पाठ करावे हे विचित्रच नाही काय ? यवतमाळ जिल्ह्याच्या भूगोल पुस्तकाच्या लेखकांनी जिल्ह्यात कधी धावता दौरा करून तरी ह्या गोष्टी ध्यानात घेतल्या काय ? ध्यानात आल्या असतील तरी त्या काढून का टाकल्या नाहीत ? की नकाशांचे सगळे ब्लॉक्स बदलविण्याच्या भीतीने ह्या गोष्टी गुपचुप चालतील तेथवर गुलदस्त्यातच असणे इष्ट असे त्यांना वाटले ? सरकारी शिक्षणाधिकाऱ्यांनी ह्या दोषांच्या बाबतीत काहीतरी हातपाय हालवलेत काय ? एकाच नाही, बहुतेक जिल्ह्यांचे अशाच स्वरूपाचे अगदी असेच रडगाणे आहे. यात्रा नसलेल्या गावी यात्रा पाहण्यात लेखक गुंगतात तर कधी यात्रा असलेल्या गावी जाण्यासाठी ह्यांचे घोडे ( कदाचित आजच्या युगातील घोडे मोटार असणे संभवते ! ) मध्येच नाला नसला तरी ह्यांच्या नकाशातील नाल्यास अडते. कधी बैलबाजार नसलेल्या गावी बैल खरीदण्यास हे लेखक जातात व फजीत पावून ज्यासाठी गेले तेच होण्याच्या श्रेणीत येऊ पाहतात ! ( बिचाऱ्यांवर त्यांच्या दुर्दैवाने असा दुर्धर प्रसंग येतो ! ) कधीकधी या

लेखकांना नवीन सडका होऊनही त्या 'याचि देही, याचि डोळा' प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे पाहण्याचा सुयोग न जाणे कोणत्या कारणांनी येत नाही? जंगल असलेल्या जिल्ह्यांमध्ये १९४० सालानंतर युद्धकाळात लाकडी कोळसे तयार करणाऱ्या कितीतरी भट्ट्या निघाल्या, लोणारी कोळशावर मोटारी, मालठेले चालू लागले व कित्येक गावी लाकडी कोळशाच्या वखारी लागल्या आणि व्यापार वाढला तरी लेखकांच्या ते लक्षात आले नाही. यवतमाळ जिल्ह्यात प्रत्यक्ष पाहणी केल्यावर ह्या चुकीच्या व अभावपूर्ण माहितीमुळे काही शिक्षक तक्रार करतांना आढळतात व पुनरपि चूप बसतात. विद्यार्थ्यांना चुकीची माहिती द्यावी लागते ह्याचे त्यांना वाईट वाटत नाही. वाटले तरी काही करायला ते स्वतःला असमर्थ समजून घेतात. स्वतःच्या पदरच्या पुस्त्या पुस्तिकेस जोडणे ते धोक्याचे समजतात. कारण अधिकारी वर्ग परीक्षक असतो आणि हा वर्ग बहुधा पुस्तकांवरच विसंबून असतो!

इतःपर अशा तऱ्हेचे चुकीचे, चूक नकाशांचे व माहितीच्या दृष्टीने अपूर्ण असे जिल्ह्याचे भूगोल निघणे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने घातक आहे; पालकांच्या दृष्टीने धोक्याचे आहे; शिक्षकांना गैरसोयीचे आहे आणि स्वतंत्र देशाला अयोग्य असे आहे यात तिळमात्र शंका नाही. ह्यासाठी पुढील सूचना अमलात आणून ही घातुक कुप्रथा बंद करता येण्यासारखी आहे आणि त्यातच भले आहे.

चुकीची माहिती देणारे जिल्ह्याचे भूगोल सरकारी विभागाकडून बंद करण्यात यावेत. त्यांना प्रतिबंध करून नवीन भूगोलांच्या बाबतीत सतर्क असावे. कोणत्याही प्रकारची चूक माहिती विद्यार्थ्यांसमोर ठेवली जाऊ नये यासाठी सरकारी शिक्षण खात्याने जपायला हवे हे सांगायला नकोच. मंजुरीच्या वेळी अन्याय व्हायला नको. निवड-मंडळाने भविष्यात तक्रारी येणार नाहीत ह्याची काळजी घ्यावी.

'बाबा आदम' पद्धती वा गतानुगतिकता कित्येक शिक्षकांना पछाडते. काही मान्यता पावलेले लेखक-शिक्षकच उत्तम लिहू शकतात, नव्याने प्रयत्न करणारे तेवढे वाईट या प्रवृत्तीतून त्यांनी पाहू नये.

त्यांनी आपली उदारबुद्धी जागी ठेवली पाहिजे. नसेल जागी तर जागृत केली पाहिजे व ती दाखवली पाहिजे. त्यांनी आपल्या विशाल वृत्तीचा परिचय दिला पाहिजे.

जिल्ह्याचा भूगोल लिहिणारा लेखक हा त्याच जिल्ह्याचा रहिवासी शिक्षक असावा. त्याचा पिंड त्याच जिल्ह्याच्या अन्नपाण्यावर पोसला गेला पाहिजे. सांगायचे तात्पर्य हे की तो त्या जिल्ह्याशी पूर्ण परिचित होऊन तद्रूपतेचा अनुभव घेतलेला असावा. असे शिक्षकच आपल्या जिल्ह्याची समग्र सत्य माहिती प्रत्यक्ष पाहून व संपूर्ण जिल्हा पायातळी तुडवून विद्यार्थ्यांसमोर ठेवू शकतील. तडफदार, नव्या दमाचे ( वृद्ध असले तरी दम 'नवा' हवा ! ) हुशार व अनुभवी (वा अनुभूतिशील) असे शिक्षक–लेखक मिळाले तर फारच छान होईल. शोध केल्यावर असे हिरे खात्रीने मिळतात. इन्स्पेक्टर–वर्गानेही इकडे लक्ष पाहचावयास हवे. असे स्थानिक जिल्ह्याचे भूगोल लिहिणारे एकदोन शिक्षक–लेखक नागपूरमध्ये नुकतेच प्रयत्न करून चुकले आहेत. वर्ध्यालाही सुमारे दीड–दोन वर्षांपूर्वी अत्यंत माहितीपूर्ण प्रश्नोत्तर भूगोल चांगल्या शिक्षक–लेखकाने काढला. पण, आर्थिकतेने म्हणा किंवा साधनांच्या सुलभतेच्या अभावामुळे म्हणा तो नकाशे वगैरेंचा अभाव दाखवता झाला व तेणेकरून मागे पडला. त्याच लेखकाचा आणखी एक वर्धा जिल्ह्याचा भूगोल माहितीपूर्ण निघाला. पण प्रकाशकांनी तो व्यवस्थित काढला नाही म्हणून असफल ठरला.

वरीलप्रमाणे लेखक मिळाले तरी पुस्तक–प्रकाशनाचा प्रश्न प्रधान आहे. प्रयत्न केले तरी ते या अडचणीमुळे विफल ठरावयाची पाळी यावयाची ! ह्यासाठी धडाडीबाज प्रकाशक निघावयाला हवेत व पुढे यावयाला हवेत. भूगोलांची पुस्तके काढावयास नकाशांच्या ब्लॉक्सच्या अवाढव्य खर्चा–व्यापामुळे प्रकाशक घाबरतात. पण आता नकाशांचे ब्लॉक्स कमी खर्चात होऊ शकतात. अशा तऱ्हेची पुस्तके प्रकाशित करण्याची हिंमत बांधणाऱ्या प्रकाशकाने प्रत्येक जिल्ह्यामधला शिक्षक असलेला लेखक पकडून त्याच्याकडून त्या जिल्ह्याचा भूगोल लिहून घ्यावा व

अशा तऱ्हेने त्या त्या जिल्ह्याचा सर्वांगसुंदर भूगोल लिहून घेऊन तो प्रकाशित करावा. ही गोष्ट अनेक दृष्टींनी उपयुक्त होईल. स्थानिक लेखकामुळे पुस्तक अचूक, माहितीपूर्ण व सुंदर निघेल. गरीब शिक्षकास ‘लेखक’ होता येईल व त्याला आर्थिक मदत होईल. आणि विशेष हे की त्याच जिल्ह्याचा लेखक असल्यामुळे त्या लेखकाचे ते पुस्तक जिल्ह्यातील शिक्षक आपल्या शाळेत अगत्यपूर्वक आत्मीयतेने लावतील. त्यात त्यांना अभिमान वाटेल !

वरील सूचना अमलात आणल्या तर आज जिल्ह्याच्या भूगोलाच्या बाबतीत चुकीच्या माहितीमुळे व चूक नकाशांमुळे विद्यार्थी व शिक्षक यांचा जो गोंधळ उडतो तो टळू शकेल.

* * * * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ६५४३८ विः निबंध
क्रमांक २०८६ नोंः दिः १५।३।६९

# ४ शाळा, घर आणि सद्गुण

**स**द्‌गुण अंगी बाणणे वा बाणविणे यासाठी शाळेत मिळणारा वेळ पुरेसा नाही, हे सत्य वारंवार लक्षात आणणे अत्यावश्यक आहे. बुनियादी शिक्षणपद्धतीप्रमाणे शिक्षक व विद्यार्थी यांचा निकट संपर्क आला तरीही हे कार्य होण्याजोगे नाही. शाळेची वर्षे मुलांच्या वयाची बरीच पुढची वर्षे असतात. त्यापूर्वीही या बाबतीतली बीजे मुळापासूनच पेरली व अंकुरली जाणे आवश्यक आहे. तात्पर्य, मुलांचे जीवनच मुळी सद्‌गुणांना पोषक अशा वातावरणात विकसित होत गेले पाहिजे; नव्हे ते त्यात घोळून निघाले पाहिजे.

सद्‌गुणसंपत्तीच्या जोपासनेवर सर्वांनीच जोर दिला; तितकीच या संपत्तीची हेळसांडही झाली व होते, हे विसरता येत नाही. मुलांना सद्‌गुणी करण्यासाठी ४–६ वर्षे आयुष्याची हवीत व तेवढ्यानेच काम भागले असे समजता कामा नये. हे जोपासना-कार्य पिढ्यानुपिढ्या चालले तर चांगल्या वातावरणात चांगली मुले तयार होत राहतील. गर्भापासून मृत्यूपर्यंत प्रत्येकाचे जीवनच सुसंस्कारी असणे नितान्त आवश्यक आहे. शाळेत मुले फार कमी वेळ असतात. त्या तुलनेने त्यांचा जास्त वेळ शाळेबाहेरच व्यतीत होतो. अशा अवस्थेत

शाळा सद्‌गुण देऊ शकेल, यावर पूर्णांशाने विश्वास ठेवता येणार नाही. शाळेत मिळाले ते बाहेर विसरले जावे, असेच घडण्याचा बराच संभव; तेव्हा, सद्‌गुणसाधनेसाठी शाळांवर सर्वस्वी अवलंबून राहणे आजच्या परिस्थितीत शक्य नाही.

**आम्हाला चहा, तुम्हाला दूध !**

लहान मुलांना चांगली सवय लावण्यासाठी घरातील सर्वांच्याच सवयी तितक्याच आदर्श असल्या पाहिजेत. मुलांना दूध देणे ठीक; ते घेणे ठीक; या कल्पनेने मुलांच्या गळ्यात दूध ढोसू पाहायचे व आईबापांनी, मोठ्या ताईभाईंनी लाललाल रंगाचा चहा मात्र फुरफुर करीत प्यायची सवय ठेवायची ! परिणाम असा होतो की मुले चहाच पिण्याचा हव्यास करतात. नव्हे, दुधाऐवजी ते जीवनात चहाचेच दर्दी बनतात. घरी नाही, दारी ते 'चहापाना'ची लज्जत चाखतातच ! घरात चहाच झाला नाही तर मुलांना चहाबद्दल आकर्षण वाटणार नाही. काही वर्षांनी मुलांना दुष्परिणाम समजतील, समजावले जातील. तेणेकरून दुसरीकडेही ती मुले चहा घेणार नाहीत. विडी–सिगरेटचे व्यसन मुलांना उशीरा लागते हे खरे; तरी त्याचे मूळ घरातील सिगरेट-बिड्यांच्या धुरातच असते, हे विस्ताराने सांगितलेच पाहिजे असे नाही.

**उशीरा उठणारांची 'मेजॉरिटी'**

सकाळी उठण्याची मुलांत, तरुणांत, माणसांत, बायांत मुळीच (!) सवय नाही हे कटू सत्य आहे. सूर्योदयानंतर उठण्याचा सराव 'बहुसंख्य' जनांना असतो ! 'मेजॉरिटी' 'लॉ' होते. पण म्हणून या दुष्ट सवयीचे समर्थन करता येत नाही. विद्यार्थी पहाटेच्या अभ्यासाने उत्तीर्ण होत नसून, ते दिवसा भरभर अभ्यास करतात म्हणून होतात. पण पहाटेचा अभ्यास कमी वेळात जास्त होतो, याचे बाळकडू त्यांना घरात कुठे मिळत नाही. तसे वातावरणच कुठे नसते. शहरात याबाबत कळस होतो. या सर्वांचे मूळ वडील माणसांतच सापडते. रात्रीच्या दुष्ट जागरणांची सवय मोठ्यांना असते. त्यामुळे दिवसा उठ-

तांना उशीर होतो. वर्तमानपत्रे वाचतांना अंथरूणात चहा घ्यायची वडिलांनाच सवय असते. त्यामुळे लहान त्याच वाटेने जातात. जबरदस्ती केली तर धाकाने ऐकतातही; पण आदर्श अचाट (!) असल्यावर त्यांनाही वडिलांचाच कित्ता न गिरवावासा वाटेल तरच नवल! घरातील सगळीच मंडळी लवकर उठली तर मुलेही उठतीलच.

**सकाळी उठण्यातच अनेक सद्गुण**

गंमत ही की, सकाळी लवकर उठण्यामुळे अनेक सद्गुण अनायासे अंगी बाणतात. फिरणे, लवकर थंड पाण्याचे स्नान, सूर्यनमस्कार, अभ्यास वगैरे गोष्टी या एका सवयीमुळे साधता येतात. पण त्यासाठी मोठ्यांची कृती तशी हवी. घरातील स्त्रियांनी याबाबत प्रथम पुढाकार घ्यायला हवा.

**ही एक वाईट खोड!**

चहा प्याल्याशिवाय शौचास जायचे नाही असा जणू शिक्षित समाजात संकेतच झाला आहे. खरे म्हणजे, उठताक्षणी शौचास जायला हवे. तशी सवय असली तर शौचास होतेच. पण आळशांना ती सवय लावून घेणे जिवावर येते आणि मग ते 'सकाळी शौचास होतच नाही' अशी समर्थनपर भाषा नेहमी बोलतात. अशा व्यक्ती ज्या घरात बहुसंख्येने वावरतात त्या घरातील मुले नेहमी तशाच वाईट सवयींची निघतात. ह्या सवयी मुलांमध्ये याव्या, आम्ही मात्र उलट वागणार, असे आचरण मुलांना सद्गुणी कसे करणार?

**सद्गुण शिकविता येत नाही**

सर्वांचा इत्यर्थ हाच की सद्गुण शिकवावयाचा नसतो. तो मुळातच असून वाढीस लागायला हवा असतो. त्यासाठी वातावरणच सद्गुणमय असले पाहिजे. चांगल्या सवयी मोठ्यांत हव्या, यावर यासाठीच आमचा कटाक्ष आहे. शाळेतील शिक्षणात केवळ 'खरे सत्य बोला, यथातथ्य चाला' या सरळ शिक्षणाची मुळीच गरज नाही, असे प्रामाणिकपणे कुणालाही पटल्यावाचून राहणार नाही. सांगण्यापेक्षा वागण्यावर, उक्तीपेक्षा स्वकृतीवर भर हवा!

* * * * *

## ५ शालेय पुस्तकांचे वाङ्मयचौर्य !

अलीकडे शालेय पुस्तकांचा फारच सुळसुळाट झाला आहे. अनेक प्रकाशक शालेय वाङ्मय-प्रकाशनाच्या धंद्यात पडत आहेत. हा एक किफायतशीर फार मोठा धंदा होऊन बसला आहे. शालेय पुस्तकांच्या भरमसाट वाढीवर टिपणे, टाचणे यांच्यासारख्या पुस्तकांनी तर खूपच ताण केली आहे. अशा पुस्तकांचा खपही खूप होतो आणि 'मागणी तसा पुरवठा' या नियमाप्रमाणे प्रकाशकही अशा प्रकारची पुस्तके फार मोठ्या प्रमाणावर प्रकाशित करीत असतात.

अशा तऱ्हेने निघालेली सर्वच पुस्तके उत्कृष्ट दर्जाची असतातच असे नव्हे. तरीही ती अनेक शाळांतून सर्रास चालविली जातात. या कारणामुळे बरेचसे शिक्षक शालेय पुस्तके लिहिण्याकडे वळतात. त्यात त्यांना मिळणाऱ्या आर्थिक लाभाचा प्रश्न तर असतोच, परंतु 'लेखक' म्हणून मिरवावयाची संधीही अनायासे मिळते !

### भाराभर पुस्तकांचा सुळसुळाट

शालेय वाङ्मयात विषय मोजके; पण पुस्तके पुष्कळ अशी स्थिती आहे. अशा वेळी एकाच विषयावर लेखक निरनिराळ्या पद्धतीने लिहू शकतो. एका लेखकाच्या पुस्तकातील लेख दुसऱ्या लेखकाने आलटून-

पालटून थोड्याफार फरकाने लिहिले तर एखाद्या वेळी क्षम्य ठरेल. परंतु लेखक म्हणून मिरविण्याची हौस धरणारे लेखक (?) याहीपुढे मजल मारतात. एखादे पुस्तक प्रसिद्ध होऊन दहापंधरा वर्षे लोटून गेली आणि त्याच्या प्रती लोकांच्या नजरेसमोर फारशा आल्याच नाहीत तर त्यातील लिखाणाच्या नकलाच्या नकला करून नवे पुस्तक लिहिण्याचा हव्यास धरणारे काही लेखक असतात व आयत्या पिठावर रेघोट्या ओढून लेखक म्हणून शेखी मिरवितात. अशा कृतीमुळे हे लेखक जनतेच्या डोळ्यांत धूळ तर फेकतातच, परंतु स्वत:चीही वंचना करतात.

**उपटसुंभ व विकृत लेखक**

याचे एक उदाहरण काही वर्षांपूर्वी माझ्या पाहण्यात आले. नागपूरच्या 'लोकांच्या शाळे'च्या प्रायमरी विभागाचे मुख्याध्यापक श्री. रा. कृ. बोडखे या लेखकाच्या नावावर 'मूकवाचन आणि अर्थग्रहणाचे नमुनेदार पाठ' या नावाची वर्ग ३ व ४ साठी दोन पुस्तके श्री. सांवशिव पांडुरंग बरडे यांच्या ज्ञानदीप प्रकाशनातर्फे (महाल–नागपूर) प्रकाशित झाली आहेत. या दोन्ही पुस्तकांतील सर्व पाठ ज्ञानदीप वाचनमालेच्या तिसऱ्या व चौथ्या वर्गासाठी १९४१ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातून अक्षरन् अक्षर उतरून घेतले आहेत. मूळ लेखकाची शिष्टाचार म्हणून परवानगी घेऊन नवीन लेखक उतारे घेऊन नवीन लिखाणाचा संपादक होऊ शकतो. परंतु एखाद्या पुस्तकाची 'कॉपी' करून स्वत: 'लेखक' म्हणून आपले नाव छापणे हे नीतिबाह्य व निंद्य तर आहेच आहे; पण कायद्याच्या दृष्टीनेही तो गुन्हा आहे. मूळ लेखकाने आपले लिखाण विकले असले तरी त्या लिखाणाचा मूळ लेखक नष्ट होत नाही. त्याच्या नावावर त्याचे लिखाण वाङ्मयक्षेत्रात नेहमीसाठी ओळखले जाते. मूळ लेखकाचा थोडासुद्धा उल्लेख श्री. बोडखे यांच्या पुस्तकात कोठेच आढळत नाही!

**बोडखे यांच्या पुस्तकातील गंमती**

श्री. बोडखे यांची पुस्तके व ज्ञानदीप वाचनमालेची १९४१ मधील वर्ग ३ व ४ ची पुस्तके एकत्रेळ नजरेखालून घातली तर श्री.

बोडखे यांच्या पुस्तकातील बहुतेक मजकूर हा मूळ पुस्तकातील आहेच आहे. परंतु आणखी काही गमती श्री. बोडखे यांच्या पुस्तकांत आढळून येतात. मूळ पुस्तकातील कंपोजिंगमधील चुका, शुद्धलेखन, परिच्छेद वगैरे गोष्टीही श्री. बोडखे यांच्या पुस्तकात बहुतेक जागी कायम आहेत. या सर्वांवर मात ४ थ्या पुस्तकातील २० व्या पाठात झालेली दिसते. मूळ पुस्तकातील 'नोबेल प्राईज मिळविणारे रवीन्द्रथान टागोर' हा पाठ (पान ६४, पाठ २० ) दोन भागांत छापला आहे. श्री. बोडखे यांनी आपल्या पुस्तकात त्या पाठाचा दुसरा भाग घेतला आहे. पण गंमत अशी की, मूळ पुस्तकात लिहिलेली 'भाग २ रा' ही जाड अक्षरे याही पुस्तकात तशीच छापली आहेत.

१९४१ साली प्रसिद्ध झालेल्या मूळ पुस्तकांच्या तीन लेखकांपैकी एक लेखक श्री. ब. पं. तांदळे गुरुजी आजही वर्ध्यास हयात आहेत. श्री. बरडे यांना पुस्तकांचे हक्क विकले गेले होते, असे कळते. श्री. बरडे यांनी आपल्या धंद्याच्या दृष्टीने 'अर्थग्रहणाची पुस्तके' काढतांना मूळ लेखकाकडूनच लिहून घेतली असती तर हा सारा अनर्थ सहज टळला असता. निदान व्यापारी धोरणातून तरी प्रकाशकांनी ही चूक करावयाला नको होती.

दुसऱ्यांची पुस्तकेच्या पुस्तके आपल्या नावावर प्रसिध्द करणे हा माझ्या पाहण्यातील तरी वाङ्मयातील नवाच प्रकार आहे. अशा तऱ्हेच्या अनिष्ट प्रथेला फोफावू न देता तिचा बीमोड करणे जरूर आहे.

* * * * *

# ६ निबंधलेखनकला

मराठी निबंधाकडे विद्यार्थी प्राय: दुर्लक्ष करतात. ह्याला कारण म्हणजे विद्यार्थ्यांना मातृभाषा म्हणजे आपलीच वाटते आणि तिच्यातील निबंध म्हणजे तळहाताचा मळ वाटतो. लिहू वेळेवर आणि मिळवू प्रथम श्रेणीचे गुण निबंधात, असेच म्हणणारे बहुतेक विद्यार्थी असतात.

विद्यार्थ्यांना निबंध म्हणजे सर्वांत सरळ, सुगम अन् अधिक गुण मिळणारा विषय वाटतो. परंतु ही त्यांची चूक आहे. गद्याची कसोटी जर कोठे उतरत असेल तर निबंधातच ! भाषाशक्तीचा पूर्ण विकास निबंधातच पाहावयास मिळू शकतो. या दृष्टीने पाहू गेल्यास निबंधलेखन ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांनी अपेक्षिलेले गुण न मिळाल्यास विद्यार्थी प्रश्न तपासणाऱ्यांवर रागावतात. परंतु ते आपल्या अपेक्षा कोणत्या गैरसमजांवर आधारल्या आहेत ह्याचा विचार करीत नाहीत.

तेव्हा, निबंधलेखनाचे महत्त्व लक्षात घेऊन त्याच्याकडे विद्यार्थ्यांनी प्रथमपासूनच लक्ष दिले पाहिजे. निबंधलेखक व्हायच्या दृष्टीने नव्हे पण परीक्षेच्या दृष्टीने तरी हे लक्ष देणे इष्ट आहे. निदान

परीक्षापध्दती चालू आहे तोपर्यंत तरी परीक्षेच्या दृष्टीने आपण तयारी केली पहिजे. याकरिताच निबंधलेखनातील काही खुब्या जाणून घेतल्या पाहिजेत.

परीक्षेच्या प्रश्नपत्रातील निबंधांवर नजर टाकल्यास आढळून येईल की वर्णनपर, विवेचनात्मक वगैरे बहुतेक प्रकारचे निबंध विचारले जातात. यासंबंधीच्या विद्यार्थ्यांच्या अपेक्षाही खऱ्या ठरण्याचा बराच संभव असतो. परिक्षेपूर्वीच्या दोनतीन महिन्यांत घडून आलेल्या खळबळजनक गोष्टी, राष्ट्रास आवश्यक अशा समस्या इ. वर एकतरी निबंध बहुधा असतोच. विद्यार्थ्याने निवडलेला विषय ज्या पद्धतीने लिहावयाचा असेल त्या पद्धतीबरोबरच तिच्यात दुसऱ्याही पद्धतीचा मेळ घालण्यात कुशलता असते. वर्णनात्मक निबंध आहे म्हणून तो त्याच पध्दतीने लिहिला पाहिजे असा ठोकताळा मनाशी बांधून विद्यार्थ्यांनी चालू नये. आवश्यक तेथे विविध पध्दतींचा उपयोग करता आला तर फारच छान !

दिलेल्या विषयांपैकी आपल्याला आवडणारा व सोपा विषय बहुतेक विद्यार्थी निवडतात. अशा वेळी साधारणत: शक्य असेल त्या विद्यार्थ्याने सर्वांना लिहिता येणारा निबंध मुद्दाम लिहू नये. परीक्षक सर्वांपेक्षा निराळे लिहिण्याकडे काळजीपूर्वक व आशेने पाहत असतो. अनेकांत एखादा निबंध निराळा आढळल्यास परीक्षक उदार होऊन त्यावर जरा जास्त गुण देऊ शकतो.

पण हे न जमल्यास सोपाच विषय निवडणे योग्य ! आणि जरी सोपाच विषय निवडला तरी त्यातही आपण आपल्या लिखाणाची चमक दाखवली तर परीक्षक खात्रीने खूष होतो. दिलेल्या 'सोप्या अन् छोटया' विषयाला 'मोठे अन् महत्त्वपूर्ण' बनविणे आणि 'मोठया व कठीण' विषयाला सरलपणे लिहून त्याची उकल करून दाखवून 'सोपा' बनविणे, यातच विद्यार्थ्याची कुशलता असते. आपल्या निबंधात काहीतरी निराळेपणा, नवेपणा आणण्याची विद्यार्थ्याने धडपड करावी. या बाबतीत त्याने नेहमीच सतर्क असणे आवश्यक आहे.

निबंध लिहितांना पाठकोऱ्या डाव्या बाजूचा उपयोग आपल्या कच्च्या टिपणांकरिता अवश्य करावा. निबंध लिहायला सुरुवात करण्यापूर्वी निवडलेल्या विषयावर जरा विचार करावा व सुचलेले विचार कच्च्या स्वरूपात तेथे भरभर टिपून ठेवून योग्य त्या जागी त्यांचा उपयोग करावा.

निबंधाची सुरुवात व त्याचप्रमाणे शेवट अत्यंत आकर्षक वठायला हवा. सुरुवातीच्या भागाची गोडी परीक्षकाच्या जिभेवर सारखी रेंगाळत राहिली पाहिजे. खरी स्थती अशी असते की, बरेचदा परीक्षक समयाभावी आदि व अंत काळजीपूर्वक वाचतो आणि मधील भाग वरवर पाहतो. याचसाठी ही दोन्ही टोके आपण आपल्या लेखणीने व्यवस्थित रंगवायला हवीत ह्याचा अर्थ असा नव्हे की मध्ये कसेही रटाळ लिहिले तरी चालेल ! तसे केले तर मग निबंधात स्वारस्यच कोठले ? निबंधाचा विकास होत गेला पाहिजे. परीक्षकाची उत्सुकता एकसारखी वाढवीत नेली पाहिजे. आपला विषय घरंगळायला नको. शेवटपर्यंत त्याची तार चढत गेली पाहिजे. उतरायला नको. याचसाठी निबंधात येणाऱ्या मुद्यांचा क्रम चढता पाहिजे. तो उतरता नको. छोटा प्रथम व नंतर मोठा मुद्दा मांडावा. वाक्यरचना व शब्दरचना यांतही असाच क्रम असावा

निबंधाचे योग्य तितके परिच्छेद पाडावे व प्रत्येक परिच्छेदात एक मुद्दा, एक विचार असावा. एका परिच्छेदातील वाक्य व विचार परस्परांत मिसळलेले असावे.

निबंधाची सजावट सुंदर भाषेत करावयाची असते. सुंदर भाषा लिहिता येणे बहुधा वाचनावर अवलंबून आहे. साधी, सरल, सुबोध भाषा लिहिणेच अधिक योग्य असते. मोठमोठी वाक्ये लिहिण्याच्या भरीस पडल्यास बरेचदा भाषेत मोठमोठ्या चुका व दोष नकळत निर्माण होतात. लांबलचक वाक्ये, क्लिष्ट भाषा, कठीण शब्दरचना यांनी निबंध बिघडण्याचा संभव असतो.

निबंधात म्हणी, वाक्प्रचार, उतारे, उदाहरणे, कवितेच्या

ओळी, सुभाषिते वापरल्याने निबंधाची शोभा खात्रीने वाढते. परंतु त्यांचा उपयोग करावाच, त्याशिवाय निबंध चांगला होत नसतोच अशी वेडगळ समजूत मनाशी कधीच बांधून ठेवू नये. योग्य त्या जागीच उक्त गोष्टींचा उपयोग करावा. कोणत्याही गोष्टींचा अनाठायी उपयोग हा कोठेही घातकच !

निबधात परस्परविरोधी मते बहुधा नकोत. त्यामुळे आपले मत मांडण्यास आपल्याला अडचण पडते व विसंगतीचा दोष निर्माण होतो. आपले मत आपल्याला आपल्या विशिष्ट पध्दतीने मांडता आले पाहिजे. परीक्षक कोणत्याही मताचा असला आणि विद्यार्थ्याने लिहिलेल्या मताविरुध्द त्याची वैयक्तिक मते असली तरी तो विद्यार्थ्याची पटवून देण्याची शैली पाहत असतो. विद्यार्थ्याच्या विरुध्द मताचा परीक्षक गुण कमी देतो, ही बऱ्याच विद्यार्थ्यांची तक्रार चुकीची असते.

आपला निबंध परिणामकारक करायचा असल्यास त्यात आपले हृदय ओता. विचारांना भावनेचा ओलावा द्या. भावनेची आर्तता वाढली की, शब्द आपोआप कागदावर उमटतात. (मात्र भावनेच्या भरात वाहावत जाऊ नका ! ) 'ग्रामीण जीवना'वर निबंध लिहायचा असल्यास तुमचे मन त्या वातावरणात एकदम फिरू द्या व त्या वातावरणाशी समरस व्हा. तन्मय होऊन लिहा. स्वतःच्या अनुभवांचा उपयोग आवश्यक तेथ जरूर करा. निबंध अधिक आकर्षक होईल.

विद्यार्थ्यांना शब्दसंख्या वा ओळींची संख्या निबंधात ठराविक दिलेली असते. ह्या दोन्ही संख्यांच्या मर्यादेत फारसा फरक पडू देऊ नये. कमी लिहिल्याने कमी गुण मिळतात आणि अधिक लिहिल्याने गुण कापले जातात हे लक्षात ठेवायला पाहिजे. ठराविक शब्दांतच आपले विचार मांडण्यात कौशल्य आहे. ठराविक ओळी लिहायला सांगितल्यास कधीकधी विद्यार्थी दूरदूर लिहून आपली ओळींची संख्या पूर्ण करतात किंवा खूप जवळजवळ लिहून निबंध जास्त लिहितात. हे दोन्ही प्रकार बरे नाहीत. याच्या मधला मार्ग विद्यार्थ्याने स्वीकारावा. त्याचसाठी अक्षर जितके चांगले काढता येईल तितके काढावे.

या सर्व गोष्टींबरोबर एक प्रमुख गोष्ट लक्षात ठेवावी, ती म्हणजे शुध्दलेखनाची ! अशुध्द लेखनामुळे परीक्षकाचे मत विद्यार्थ्यां-विषयी वाईट होते व त्याच्या हातून गुण कमी पडतात. प्रसंगी निबंध बरा लिहूनदेखील गुणसंख्या कमी होते; ह्याला कारण तरी शुध्दलेखनाचा आणि टापटिपीचा अभाव हेच असते. तेव्हा ह्याकरिता तर विद्यार्थ्यांनी खूपच जपायला हवे. शुध्दलेखनाचे नवे नियम अगदी आत्मसात झाले पाहिजेत व निबंधातच नव्हे तर मातृभाषेत लिहिलेल्या कोणत्याही मजकुरात चुका न करण्याचा नियम केला पाहिजे.

वरील सूचना लक्षात घेऊन त्यांचा प्रत्यक्ष अमल विद्यार्थी करू लागतील तर निबंधलेखनात ते खात्रीने प्रगती करतील आणि कदाचित त्यांच्यातूनच पुढेमागे मोठमोठे निबंधलेखक निर्माण होतील !

* * * * *

# ७ प्राथमिक शाळा व शब्दांची समस्या

मराठी ही शासनान्तर्गत वापराची भाषा म्हणून सुरू झाल्याचे सर्वविदित आहेच. मध्यप्रदेश शासनाने तर एतद्देशीय भाषेतून वापर करण्यास कधीच सुरुवात केली आहे. शासनाकडून व शासनाच्या बाहेरही 'शब्द घडविणे व वापरणे' आंशिक रीत्या आरंभ झाले आहे. प्राथमिक शाळा सर्व शिक्षणाच्या भव्य इमारतीचा पाया समजल्या जातात. अर्थात हे कार्य प्राथमिक शाळांतून विशाल प्रमाणात आणि शीघ्र गतीने सुरू झाले असावे किंवा सुरू झाले असले पाहिजे हीच कोणाचीही अपेक्षा असणार! परंतु आश्चर्याची गोष्ट ही की या 'पाया-' चे काम अगदीच 'थंड' आहे. वास्तविक शिक्षणखाते, शिक्षणाधिकारी, शिक्षक, पालक आदि प्राथमिक शिक्षणक्षेत्राच्या संबधित लोकांनी त्यांच्या परिसरातील 'शब्दांची समस्या' सोडविण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे. ही त्यांच्यावरील एक मोठी जबाबदारी आहे. वरवर पाहता ही शब्दांची समस्या अगदी 'ही' दिसत असली तरी फार मोठी आहे, हे शब्दसमस्येच्या पुढील 'अल्प पसाऱ्या'वरून दिसून येईल. या समस्येचे थोडक्यात चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. तीवरून योग्य ती कल्पना शिक्षक आणि शिक्षणाधिकारी यांना येईल. नेहमीच्या वापरात

आज अनेक गल्लत शब्दप्रयोगांची खिचडी झालेली आहे. खिचडी अवसेपुनवेसारखी एखाद-दिवशीच खावीशी वाटत असली तरी नेहमी खायचे जिवावरच यायचे ! आणि रोज खाणारा आढळला तरी त्याच्या खाद्याभिरुचीला कोणत्या दर्जात बसवावे हे वाचकांनीच ठरविलेले बरे ! तात्पर्य, खिचडी खाऊन खाऊन तरी किती खाववणार ? शब्दांच्या खिचडीचा कंटाळा ज्ञानाशी नित्यसंबंधित असलेल्या गुरुजनांना व शिक्षण-संबधितांना आतातरी यायलाच पाहिजे !

प्राथमिक शाळांची मूळ नाडी अध्यापक विद्यालयात वा प्रशिक्षण विद्यालयात सुरू होते. अध्यापक विद्यालय किंवा प्रशिक्षण विद्यालय म्हणजे 'नॉर्मल स्कूल' हे येथे समजावे म्हणून मुद्दाम खुलासा करावा लागतो, ही शब्दसमस्येची सुरुवातच किती मजेदार आहे ! दोन वर्षांचे 'ट्रेनिंग' घेतल्याशिवाय 'मास्तर' होता येत नाही. 'मॅट्रीक' 'पास' विद्यार्थ्यांसाठी आता 'स्पेशल कोर्स' असतो, तो भाग वेगळा ! 'ट्रेनिंग'ला प्रशिक्षण हा शब्द असून अजून तो फारसा प्रचारात नाही. मास्तर हा शब्द इंग्रजी आहे याची शंकाही येत नाही. वास्तविक पाच-पन्नास मेंढरांवर पाळत ठेवणारा धनगर हा जसा मेंढरांचा मास्तर (मास्टर = धनी) तसाच चाळीस-पंचेचाळीस मुलांवरचा हा मास्तर! मूळचा अर्थ किंचित वाईटाकडे झुकणारा असूनही त्या शब्दाला सोडून नवीन स्वरूपाचा 'शिक्षक' वा 'अध्यापक' हा शब्द घ्यायला आम्ही अजून तितकेसे तयार नाही. 'मास्तर'ला 'की' लावून 'मास्तरकी' हा धेडगुजरी शब्द बनविताना आम्हास काहीच वाटत नाही किंवा 'हेड-मास्तर' न लिहिता 'मुख्याध्यापक' असे लिहिल्यास पाचपंचेचीस पोरे सांभाळणाऱ्या काही मास्तरांचा 'हेड' जो 'हेडमास्तर' त्याला किंचित राग आल्याशिवाय राहत नाही, हा अनुभव आहे. 'नॉर्मलस्कूलचा इंटरव्ह्यू' तर प्रवेशपरीक्षा देणाऱ्यांना एक दिव्यच वाटते व त्यामुळे तोच शब्द त्यांना ठाऊक असतो. त्याचा प्रतिशब्द बनविण्याचा, समजावून घेण्याचा अथवा कोठे पाहण्याचा प्रयत्न प्राथमिक शिक्षक करणार नाही. कारण रहाटगाडग्याप्रमाणे 'प्रायमरी' शाळेत 'सर्व्हीस' करून एकदाचे

'रिटायर' होणे फक्त त्यास ठाऊक असते.

'नॉर्मलस्कूलां'च्या 'बेसिक,' 'बुनियादी' वगैरे अनेक शब्दांची समस्या येथेच टाकून देऊन आपण आता आपल्या शाळेत जाऊ या.

नोकरीवर प्रथमच लागलेल्या प्रा. शिक्षकाने कामावर रुजू होताच सही करावयाला समोर येते पहिल्यांदा शिक्षकांच्या हाजरीचे 'रजिस्टर'! तेथे सही करणारा शिक्षकही इंग्रजीचे ट फ माहीत नसले तरी सही घासतो इंग्रजीतच व मराठीत लिहणारा 'चिरकुटा धोंडबा मास्तर' 'चि. धों.' ह्या आद्याक्षरांनी सही न करता, 'सी. डी.'च्या 'इनीशीयल'नेच करतो. बापाच्या नावाचे 'धों' हे आद्याक्षर त्याला धोंड्यासारखे लाज आणणारे वाटावे हेच नामुश्कीचे!

त्याच वेळी नव्या 'मास्तर'ला निरनिराळ्या 'चार्टा'त आपली माहिती भरून द्यावी लागते. वर्गात पाय टाकण्यापूर्वी शिक्षक दारावरची अक्षरे वाचतो – 'वर्ग १ ला -- सेक्शन क + ड.' वाचून तो आत जातो; परंतु 'सेक्शन'ऐवजी 'तुकडी' आणि 'क + ड' ह्या इंग्रजीच्या पिल्ल्यांना दूध पाजण्याऐवजी देवनागरी लिपीतील अ आ अगर क ख ग या क्रमाचा उपयोग का करू नये?– याचा विचार करायला त्याचे डोके तयार नसते.

वर्गात गेल्यावर मुले कुजबुजतात, "नवीन 'सर' आले." लवकरच 'हजरी-बुक' समोर येते. हे 'बुक' 'हजरी'च्या शेपटाला जुळविल्याने झालेला समास कसा मजेदार वाटतो ना!

शिक्षकांच्या हजरीला मुले वेडगुजरी उत्तर देतात-- 'हजर सर!' आणि त्यामुळे 'सर सर'ची अगदी सरबत्ती सुरू होते. ह्या 'सर'ची हकालपट्टी केव्हा होणार? 'हेडमास्तर' स्वसहीनिशी इंग्रजीत तारीख घालून 'नोटीस–बुका'त 'नोटीस' पाठवतात आणि 'मास्तर' त्यांच्या 'नोटीसी'प्रमाणे 'क + ड' चे 'प्रोग्रेस बुक,' 'टाईमटेबल,' निरनिराळे 'चार्ट,' 'फ्लॅशकार्ड' वगैरे तयार करायला लागतो. मुलांना 'बोर्डा'वरचे लिहायला सांगतो व 'डस्टर' नसल्यास हातानेच पुसतो.

शाळेत वरून येणाऱ्या हुकुमात 'निरीक्षक' व 'अधीक्षक' यांच्यासारखे शब्द आता यायला लागले असले तरी सुपरिटेंडेंट, अटेन्डन्ट ऑफीसर, इन्स्पेक्टर, स्कूल सुपरवायझर इ. शब्दांचा वापर कमी झाला असे नाही. वरून येणारी 'सर्क्युलरे' 'सर्क्युलेट' करण्यासाठी 'ऑफीस-प्यून' नेहमी 'लेट' करतात ही 'ऑफीसक्लार्कां'ची नेहमीची 'कंप्लेन्ट' असते. शाळेत पंधरा 'मिनिटे' लेट झाल्यास लाल शाईची सही व शिवाय अर्धी 'कॅज्युअल' जाते हेही सर्वांना ठाऊक असते. 'कॅज्युअल' रजेच्या अगर 'मेडिकल' वा 'सीक' 'लीव्ह'च्या अर्जाची सुरुवात अजूनही 'मेहरबान'नेच व्हावी हे दुर्दैवच ! मेहरबानी व हाजीहाजीचे युग मागे पडले असून 'माननीय' जग आता आले आहे, आज्ञाधारक चाकरांना आता पायाशी हात जोडून अर्ज सादर करण्याची तेवढीशी आवश्यकता नाही, हे 'माननीय अधिकारी' समंजसपणे मान्य करणार नाहीत असे नाही. ज्यांना पूर्वीच्या भोंगळ कुसंस्कारांना रूढिवादितेच्या दृष्टीतून पुढे चालवायचे असेल त्यांना मात्र ह्या नवीन पद्धतीच्या प्रचलनाने अपमान झाल्याचे दुःख होईल ! 'फक्त तारीख' लिहिण्याची आज काय आवश्यकता आहे ते समजावून द्यायला कोणीही तयार होत नाही ! 'लोन' 'इमर्जंट' 'ऑर्डिनरी' 'सोसायटी' 'मुन्सीपालटी' 'सीव्हील' हे शब्द तर आमच्यापैकी प्रत्येकालाच ठाऊक असतात, तेव्हा त्याचे वर्णन नको !

खेळणे, कुदणे म्हणजे स्वैर हडेलहप्पी ! मस्त आनंद मनसोक्त उपभोगणे हा खेळांचा खरा हेतू ! पण त्या स्वैरपणातही एकप्रकारची शब्दांची बंधनात्मक उसनवारी करावी लागते. 'व्हिसल, लेफ्ट, राईट, बँड, ड्रील, कबिंग, टूर्नामेंट, रेफ्री, टीम' यांतील बऱ्याच शब्दांना प्रतिशब्द असूनही ते वापरण्याकडे अजून प्रवृत्ती होत नाही. 'क्रॉसपट्टी' हा घेडगुजरी शब्द भाषेचे भूषण म्हणावयाचे की काय ? 'लॉबी' अजून आहेच. गडी बाद होण्यापेक्षा 'आऊट'च जास्त होतात !

"'कंपलसरी' शाळेत बदली झाली की लागले मूत मागे-"

ही काही शिक्षकांची तक्रार ! 'कंपलसरी' शिक्षणदेखील या शब्द-जंजाळातून सुटत नाही. तेथे 'सेन्सस' होते. 'रजिस्टरे' असतात, 'बुकें' कमी नसतात. आणि 'इतल्ला' नि 'फॉर्म' तर पुसूच नका. 'सर्कलासर्कला-तून' हिंडता हिंडता 'मास्तरां'च्या नाकी नऊ येतात.

वर्षाच्या शेवटी 'सालतमामचे नक्शे' करायची मोठी भानगड असते. नवीन माणसाला हा शब्दप्रयोग कसा वाटत असेल ? 'सालतमाम' काय अन् 'नक्शे' काय, सारीच उर्दू–फारशीची मिरासदारी ! मराठीत तरी हा प्रयोग अगदीच हेंगाडा वाटतो. 'सालतमाम'मधल्या सगळ्याच 'नक्शांची' शहानिशा करीत बसण्यासाठी येथे तरी वाव नाही, तेव्हा पुरे !

वर्षाच्या शेवटी मुलांच्या वार्षिक परीक्षा होतात. तेव्हा खूपच धांदल उडणे साहजिक आहे. 'मास्तर' 'रिझल्टशीट' तयार कर-ण्यात गुंतले असतात आणि मुलांची जास्त 'मार्क' मिळविण्यासाठी अभ्यासाची धडपड चालू असते. त्यांना 'मार्क' माहीत, पण 'गुण' किंवा 'अंक' त्यांच्या गावी नसतात. शिक्षकांनाही त्या गावी जायची आव-श्यकता वाटत नाही. 'पेपर' कसे सोडवून घ्यायचे हे त्यांचे धांदलीचे काम ! 'इनिसपेटर' आणि 'बोर्ड' तिसरी–चौथीच्या मुलांनादेखील माहीत असते. यावरून त्यांच्या सामान्यज्ञानाचे कौतुक करायला वाच-कांना मोकळीक आहे !

अखेर एकदाचे गंगेत घोडे न्हाऊन निघते. 'सुपरवायझर, हेडसुपरवायझर, इनिसपेटर, सुपरिंटेंडेंट, मास्तर, हेडमास्तर' वगैरे मंडळीच्या देखरेखीखाली परीक्षा होऊन 'पेपरांची बंडले' तपासली जातात. 'ग्रेस मार्क,' 'फेल' पोरांना देण्या न देण्याचे प्रकार होऊन जातात व मग लागतो निकाल. निकाल म्हणजे गोड गोष्ट ! पण तेथे विचित्र शब्दप्रयोगामुळे कडवटपणाच आपला प्रभाव गाजवतो. 'पास, नापास' हेच शब्द लिहिले, सांगितले व बोलले जातात. मुले त्या शब्दां-वर पाहिजे तशा कोटया करून त्या शब्दांच्या नालायकीचे प्रदर्शन करतात. 'ना' हा शब्द 'पास' या इंग्रजीच्या मागे उगाच लावून देतात.

शेवटी ज्याला बक्षीस मिळावयाचे त्याला अखेर इंग्रजांच्या भाषेतलाच 'नंबर' मिळवावा लागतो, हे दुर्दैवच म्हणावे लागेल !

वरील विवरणावरून आम्हास शालेय क्षेत्रात परक्या शब्दांची गुलामगिरी कशी सासुरवास करते हे दिसून येईल. फक्त काही उदाहरणेच वर दिली आहेत. संपूर्ण विवेचन करू गेल्यास एक फार मोठा लेख तयार होईल. पण ते काम येथे आटोपण्याऐवजी सुबुद्ध व विचारी वाचकांवरच सोपविणे बरे !

* * * * *

## ८ जपानी मुले

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धरी' अशी आपल्याकडे म्हण आहे. बाळाला अंगाई गाऊन दोरीने झोका देतांना आईस किंवा ताईस आपण पाहतो. परंतु जपानात यातले काहीच नसते. जन्माला आलेले मूल पाळण्यात पडावे, हे जसे आपल्याकडे ठरलेले, तसे जपानात नाही. पाळणे तर तेथे नाहीतच; पण कडेवर बसण्याचे देखील जपानी मुलांना जुळायचे नाही. आपल्याकडे खेडयातल गरीब बाया किंवा पारधिणी लहान मुलांना पाठीवर फडक्यात बांधून वागवतात ना, तसेच जपानात आई आपल्या मुलास पाठीवर कपडयांच्या झोळीत वागवते. हाच जपानी पाळणा ! या पाळण्यात मुलास घालून आई काम करते, बाजारात जाते, प्रार्थना–मंदिरातून येते व बाळ रडायला लागले तर पाठीला जरा इकडेतिकडे हालवून व काहीतरी पुटपुटून त्याला झोपवते !

### फुलामुलांचा स्वर्ग

घरात मूल जन्माला आले, की त्याचा सर्वांनाच आनंद व्हायचा ! जन्मानंतर सातव्या दिवशी जपानी मुलाचे नाव ठेवण्यात येते. मुलींची नांवे विशेषतः फुलांवरून ठेवली असतात. आपल्याकडची

कमल, मालती, नलिनी, बकुळा, शेवंती, पुष्पा, कुमुद, कुसुम ही अशाच प्रकारची नावे होत. काही मुलांची लाडाची लहानपणची नावे जपानात पंधरा वर्षांनंतर बदलवतात जपानी मूल एक महिन्याचे झाले म्हणजे त्याचे जावळ उतरवून देवीच्या दर्शनास त्याला नेतात. मुलींचे केस तीन वर्षेपर्यंत कापतात व मग वाढू देतात. जपानी मुली आपल्या केसांच्या नीटनेटकेपणाची फारच काळजी घेतात.

फुलामुलांची आवड असलेला जपानसारखा दुसरा देश नसेल ! जपानात जिकडेतिकडे फुलांप्रमाणेच सुंदर चेहऱ्यांची हसरी व उत्साही अशी मुलेच मुले पाहून परदेशी प्रवाशी जपान देशाला फुलामुलांचा स्वर्ग मानतात. 'मुले म्हणजे देशाचे सर्वांगीण सौंदर्य' अशी भावना जपानात असल्यामुळे मुलांच्या विकासासाठी घरापासून तर सरकारापर्यंत फार प्रयत्न केले जातात. शाळेच्या शिक्षणाइतकेच घरच्या शिक्षणास महत्त्व; व म्हणूनच मुलांना नवी नवी ठिकाणे दाखवून ज्ञान देण्यात आईबाप कसूर करीत नाहीत. रेडिओ लावणे, फोन घेणे, फोन करणे इ० गोष्टींचे ज्ञान मुलांना लहान वयात घरीच होते. तिकडे लाकडी पट्ट्यांच्या आपल्या टुमदार लहानशा घरापुढे भाजीपाला व फुलझाडांची बाग करण्यासाठी वडील मेहनत घेतात; तर इकडे जवळच दुसरी एक चिमुकली बाग बालकमंडळीसाठी तयार होते. स्नानाच्या सांडपाण्याने वाहणाऱ्या इवल्या इवल्या पाटांनी ह्या बागेला पाणी दिले जाते, शेजारून एक लहानशी झुळझूळ नदी वाहते व तीवर चिमुकला पूल पण असतो !

**बालकमंदिरे व विविध शिक्षण**

जपानात बालकमंदिरेही आहेत. शाळा सुंदर, हवेशीर व सर्व तऱ्हेच्या सुखसोयींनी सुसज्ज अशा आहेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असले तरी सक्ती न करताच मुले शाळेत जातात. कमीतकमी ३२ आठवडे म्हणजे वर्षांतून आठ महिने मुलांनी शाळेत हजर असलेच पाहिजे, असा नियम आहे. शाळेला बुट्टी मारायची वृत्ती मुलांत नाही. शाळेत लेखन, वाचन, गणित इ. पुस्तकी शिक्षणाबरोबरच उद्योग, शिवणकाम,

कलाबतूचे काम, हस्तकाम, गायन, चित्रकला इ. उपयुक्त विषयांचे शिक्षण देण्यात येते. जपानी अक्षरे चित्रांचीच असल्यामुळे सुंदर चित्रे काढण्यात जपानी मुले हुशार असतात. पेन किंवा टाक यांच्याऐवजी ब्रश वापरीत असल्यामुळे त्यांचे अक्षर सुंदर असते. आपण उजळणी जशी वरून खाली लिहीत येतो, तशी जपानी अक्षरे वरून खाली लिहिली जातात. मुलींचा ओढा भाषाविषयाकडे जास्त असतो, म्हणूनच की काय, जपानात लेखिका अधिक आढळतात !

शिस्त आणि कवायती शिक्षण यांवर जपानात विशेष भर आहे. दर तासानंतर पंधरा मिनिटे व्यायामाची असतात. लष्करी शिक्षणाची सुरुवात प्राथमिक शाळेपासूनच होते. सर्व मुलांचा शाळेतील पोशाख एकाच पद्धतीचा, लष्करी धर्तीचा असतो. कवायती शिक्षणाची मुलांत फार आवड असते आणि लुटूपुटू लढायांचे खेळ खेळण्यात मुले अतिशय रंगतात. कधीकधी भान न राहून मुलांच्या ह्या लुटूपुटू लढायांनी शेतकऱ्यांच्या उभ्या पिकास नुकसान पोहचते. परंतु प्रेमळ शेतकरीदादा याबद्दल कधी कुरकुरत नाहीत.

गुरुजी मुलांना सहली व वनभोजन यांसाठी घेऊन जातात. उमलती कमळे पाहण्यासाठी पहाटेला जायचा गुरुजी व मुले कधी कंटाळा करीत नाहीत. जपानची हवा तेथील मुलांना मानवते आणि म्हणूनच ती मुले सुंदर गोंडस व गोजिरवाणी दिसतात !

स्वभावविशेष

जपानी मुले आचरणाने उत्तम असतात. आईबाप व गुरुजी यांची आज्ञा ते कधी मोडत नाहीत. शिव्या कधी त्यांच्या तोंडात येतच नाहीत; कारण जपानी भाषेत शिवीसाठी मुळी शब्दच नाहीत. जपानी विद्यार्थी शांत, साहसी, कामास न कचणारा, आपल्या देशावर प्रेम करणारा, मोठ्यांबद्दल आदर बाळगणारा, समजदार, नवीन गोष्टी शिकण्यास तत्पर असलेला, महात्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी व आनंदी असा असतो. स्नानाचा जपानी मुलांना कंटाळा नाही. झऱ्याच्या गरम पाण्याचे दिवसातून दोनदा स्नान करण्याची त्यांना सवय आहे.

कोणत्याही रूढ धर्ममतांचे शिक्षणसंस्कार जपानी मुलांवर करण्यात येत नाहीत. म्हणूनच नीतिकथांची पुस्तके जपानी मुलांना पूर्वीपासून आवडत आली आहेत. सर्वांनी सर्वांवर प्रेम करावे अशा तऱ्हेची नैतिक शिकवण त्यांना घरी व शाळेत मिळत असते.

**घर, मुले आणि फुले**

जपानी घरात टेबलखुर्च्या नसतात. त्यामुळे तेथील मुले चटयांवर बसूनच अभ्यास करतात. शेजारी एक छोटा स्टूल असतो. त्यावर फुलांचा गुच्छ असलाच पाहिजे ! घरची मुले फुलांनी देवघराला शोभा आणतात. चेरी, कमळे इत्यादि फुलांची बनेच्या बने असलेल्या जपान देशात फुलांचे वेड मुलांनाही अतिशय आहे. मुलींना तर शाळेत किंवा घरात फुलांचे गुच्छ, हार, वेण्या अशा वस्तू करण्याचे शिक्षण लहानपणीच मिळते. चेरी-फुलांचे उत्सव व रोषणाई पाहण्यास मुलां-मुलींसकट सारे गाव लोटते !

**शिस्तीचे बाळकडू**

आदरसत्काराच्या व नेहमीच्या वागण्यातील चालीरीती जपानी मुले लहानपणीच आत्मसात करतात. चहाचे तबक कसे धरावे, किती उंचीवर धरावे, कुठे अन् कसे ठेवावे, पंगतीत कसे बसावे, नमस्कार कसा करावा, कुणाच्या खोलीत शिरतांना 'येऊ काय' -कसे विचारावे, आत कसे जावे वगैरे बाबींची माहिती जपानी मुलांना लहान वयातच होऊन जाते. म्हणूनच पाहुण्यांचे स्वागत करण्यात ती वाकबगार असतात. गुडघे टेकून, मान लववून ते पाहुण्यास तीनतीनदा नमस्कार करतात. शाळेत पोहचताच गुरुजींनाही ते उस्याने मान वाकवून व श्वास वर ओढून वंदन करतात. नम्रतेने मान वाकविण्याची त्यांना सवयच झाली आहे. ह्यांच्यासारखे नमस्कार करतांना, सराव नसल्यामुळे, आपण तर अगदी बेजारच होऊन जाऊ !

जपानी मुले चिडत नाहीत; भांडत नाहीत; जोराने ओरडत नाहीत. हळू बोलायची त्यांना सवय असते. शिस्तीने वागण्याचे बाळकडू त्यांना लहान वयापासूनच मिळते. बाहेरून आल्यानंतर ओल्या

कपड्याने हातपाय व तोंड पुसल्याशिवाय जपानी मुले चहा घेणार नाहीत. जपानी चहा म्हणजे बिनादुधाचा, साखर नसलेला काढाच ! त्यांच्या जेवणातही चहा असतो. भात व मासे हे त्यांचे मुख्य खाद्य आहे. लाकडी ताटवाटयांत लाकडी चमच्यांनी जेवणारी जपानी मुले पाहिली की गमंत वाटते.

जपानी मुले पोकळ बाह्यांचा कमरबंद असा पायघोळ झगा घालतात. त्यास 'किमानो' असे म्हणतात. पायांत अंगठे अलग शिवलेले मोजे असतात. मुलींचे झगे भडक रंगाचे असतात.

मुलांचे छंद

जपानी मुलांना घरकामाची लाज वाटत नाही. मुलींना तर घरकामाचे शिक्षणच दिले जाते. खेळणी, कागदी कंदील, चित्रे व वेलबुटयांच्या छत्र्या, टोपल्या, बाहुल्या, नाना तऱ्हेचे पंखे, फटाके इ. लहान वस्तू तयार करण्याच्या कामी घरातील मुले, विशेषतः मुली फार मदत करतात. सौंदर्याची आवड असलेली जपानी मुले कागद चिपकवून घरादाराचे सौंदर्य वाढवतील.

जपानी मुलांना अभ्यासाचा जसा कंटाळा नाही तसा खेळण्याचाही कंटाळा नाही. लहानपणापासून मुले गावभर गल्लोगल्ली खेळत भटकत असतात. मुले हरविण्याची भीती जपानांत नाही. मुलांच्या कपड्यांत त्यांचे आईबाप त्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या पत्त्यांसह ठेवत असतात ! त्यामुळे चुकलेल्या मुलांना जपानी लोक त्यांच्या घरी सुरक्षित पोहचवून देतात. दागिन्यांची पद्धती जपानात नाही; म्हणून चोरांचीही भीती नाही !

जपानी मुलांना भोवरा खेळता येतो. ती मासे पकडण्यात पटाईत असतात. फुलपाखरांना पकडण्याची त्यांना खोड असते. कागदांच्या गाड्यांत तांदूळ भरून झुरळांच्या बैलांकडून त्या गाड्या ओढविण्यात जपानी मुलांना मौज वाटते ! लपंडाव खेळण्याची संधी पण ते दवडत नाहीत.

छोटया छोटया टेकड्या व शेतीवाडीच्या परिसरात नद्याच नद्या आणि पाणीच पाणी असलेल्या जपानी खेड्यातील आणि शहरातील

मुलांना पोहण्याची हौस फार! रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी तर झुंडीच्या झुंडी नदीवर जातात. मोठ्या मुली छोट्या मुलामुलींना पोहायला शिकविण्यात अगदी रंगून जातात.

बाहुल्या आणि पतंग

मैदानात मुलींचेही थवेच्या थवे खेळतांना दिसतात. जपानी मुलींना बाहुल्यांची आवड अतिशय असते. आजीपणजीपासूनची जुनी बाहुली नात-पणनात अगदी काळजीपूर्वक जपून ठेवते, तिला सजवते आणि खेळवते!

मुलींच्या बाहुल्यांचा खेळ जपानात फार गाजतो. हा सण दरसाल मार्च महिन्याच्या तीन तारखेला येतो. शेकडो वर्षांपूर्वीच्या बाहुल्या या दिवशी बाहेर निघतात. भातुकल्या होतात. खायला उसासारखे बांबू देतात! मुलींच्या आनंदाला पारावार नसतो. एकच धमाल गर्दी उडालेली असते.

दरवर्षी मे महिन्याच्या पाच तारखेला मुलांचा एक मोठा सण येतो. एरवी चित्रविचित्र कागदांचे व निरनिराळ्या आकारांचे मोठमोठे पतंग उडविण्याऱ्या जपानी मुलांची पतंगांची हौस या सणाच्या वेळी पराकोटीला पोहचते. या दिवशी धबधब्यातून पसार होणारे मासे शिताफीने पकडण्याचा खेळही मुले खेळतात. याच दिवशी लुटूपुटूची मोठी लढाई खेळण्यात मुले दंग होतात. बांबूच्या तरवारी घेऊन दोन टोळ्यांतील मुले डोक्यावर मडक्यांची घमेली चढवून लढायला येतात! विरुद्ध बाजूकडची जास्त मडकी फोडणारा पक्ष विजयी होतो! या दिवशी गुढ्या उभारण्यात येतात आणि आनंदाच्या भरात बालकवी कविता लिहून त्यांना काठीच्या टोकास अडकवून नाचतात!

वीतभर जपान...

जपानी मुलांचा हा आनंद, हा उत्साह पाहून त्या देशाच्या उत्कर्षाच्या कारणांची काहीशी कल्पना येऊ शकते. म्हणूनच तर काही वर्षांपूर्वी जपानबद्दल म्हण प्रचारात आली होती --

वीतभर जपान पण त्याच्याविना हालेना जगाचे पान!

* * * * *

# ९ मूलोद्योग, श्रद्धा व प्रार्थना

'नयी तालीम' अथवा मूलोद्योग शिक्षण योजनेचा भर जीवन-शिक्षणावर आहे. शिक्षणाचा पाठलाग जीवनाने करणे म्हणजे जीवन-विनाश, ह्या भूमिकेतून जीवनाचा मागोवा शिक्षणाने घेणे म्हणजे जीवन-विकास, यशस्वी जीवनाचे मर्म, ही कल्पना स्फुरलेली आहे. नयी तालीम योजना जीवन-विकसनासाठी आहे. शिक्षण म्हणजेच प्रत्यक्ष जीवन असून शिक्षण व जीवन यांचे घनिष्टत्व आहे ही या योजनेची मूळ बैठक आहे. जीवन यशस्वी होण्यासाठी जीवनात काही विशिष्ट गोष्टीचे आचरण अत्यावश्यक आहे. जीवन-साफल्य हे जीवनाचे अंतिम इप्सित प्राप्त करून घेण्यात आहे. जन्मास आलेल्या प्रत्येक माणसाने आपल्या जीवनाचा विकास करीत ईशस्वरूपाला मिळावे असे हिंदूच काय, पण जगातील सर्व धर्माचे प्रतिपादन थोड्या फार फरकाने मिळतेजुळते असे आहे. जीवनाची ही अंतिम यशस्वी परिसीमा आहे. ह्या सीमेवर पोचण्याकरिता जीवन ठराविक दिशेने प्रगत व उत्क्रांत होत जावयास हवे. ही उत्क्रांती व्हावयाला कायिक, वाचिक, बौद्धिक, मानसिक शुद्धीची, नैतिकतेची-नितांत आवश्यकता आहे. ह्या सर्व गोष्टींना जर श्रद्धेची साथ मिळाली नाही तर इप्सिताच्या वाटेने जाणारा

पांथस्थ मध्येच हताश होऊन बसेल. तो आपल्या इच्छित स्थळी पोचू शकणार नाही. त्यासाठी त्याला श्रद्धेची शिदोरी पाठीशी बांधून घेणे अत्यावश्यक आहे. श्रांत मनस्थितीत त्याला श्रद्धा धीर देईल व तो नेटाने आपले एकेक पाऊल पुढे टाकील.

श्रद्धा हे एक असामान्य सामर्थ्य आहे. श्रद्धा ही प्रगतीच्या शाश्व प्रचंड पराकाष्ठेची पावन पायरी आहे. श्रद्धा हे अनत्याचारी आणि अवडंबरहीन असे प्रभावी शस्त्र आहे. श्रद्धा हे एक मौलिक शास्त्र आहे. श्रद्धा हे अभूतपूर्वदर्शनाचे द्वार आहे. श्रद्धा ही अभेदभावाची अलौकिक जन्मदात्री आहे. म्हणूनच ती जीनवदात्रीही आहे इह आणि पर, वास्तव आणि अवास्तव, परम आणि चरम उत्कर्ष बिंदू, स्वर्ग आणि स्वर्गीयता, मानव आणि मानवता ही या सामर्थ्यशालिनीची क्रीडाक्षेत्रे आहेत. चिद्विलासाची चिन्मयशक्ती हिच्या पोटी सूक्ष्मत्वाने नित्यासाठीच वास करते !

श्रध्देच्या अभावी कोणतेही कार्य भरीव होऊ शकत नाही. श्रध्देशिवाय संशयाचा बुजबुजाट अपेक्षित अन् अंगिकृत कार्यात धुडगूस घालतो. परंतु श्रद्धेच्या साम्राज्यात अशा नास्तिक्यावर आधारलेल्या अन्य पुळचट बाबींना शिरकाव नसतो. श्रद्धा त्या पांथस्थाला फक्त पुढे नेण्याचे काम करीत असते.

जीवनाच्या विकासातच जीवनाचे सारे सार आहे. हे विकसन श्रद्धेने भरीव स्वरूपाचे होऊ शकते. श्रद्धेतून उद्भूत झालेले विकसन शीघ्रगामी व प्रभावी ठरते.

श्रध्देला आणखी जोड हवी आहे प्रार्थनेची ! प्रार्थना मनुष्याच्या मानसिक विकासाचा राजमार्ग आहे. प्रार्थनेतील दिव्य ठरल्या गेलेल्या शक्तींनी, घडून येणाऱ्या अद्भुत कार्यांनी आजवर जगाला तोंडात बोटे घालावयाला लावली आहेत.

श्रध्दा आणि प्रार्थना या दोहोंनी मानवी मनाची, शरीराची किंबहुना मनुष्याची सर्वांगीण उन्नती होते. उन्नतिशील हालचालींनाच मानवी जीवन या नावाने यथार्थपणे संबोधले जाते. मानवी जीवन तयार करण्याचे काम 'नयी तालीम' योजनेत प्रामुख्याने घडून येते व हे कार्य श्रध्दा आणि प्रार्थना या मूल पण सूक्ष्म विकसनशील बाबींवरच प्रामुख्याने वाढीस लागत असते.

* * * * *

## १० शिक्षणदृष्टी : काल, आज आणि उद्या

शिक्षकाच्या शैक्षणिक दृष्टीचा शोध लावावयाचा झाला तर त्यासाठी काही हजार वर्षे तरी आपल्याला मागे जावे लागेल. 'टोपे' नावावरून 'टोप' किंवा 'टोपी' यांच्या प्राचीनत्वाबाबत अंदाज बांधणाऱ्या किंवा खेड्यापाड्यातील 'दंडारी'चा संबंध 'दंडधारी' कृष्णाच्या रासलीलेपर्यंत पोचविण्याचा खटाटोप करण्याचा आव आणणाऱ्या संशोधकाच्या भूमिकेतून कसलाही जावईशोध न लावतासुद्धा सहज तऱ्हेने आपली दृष्टी त्या कालापर्यंत पोहचू शकायला अडचण पडत नाही.

### 'पोटोबा'ची तक्रार नव्हती !

जीवनकलहामुळे जगाचे जिणे जरी आज उणे झाले असले तरी प्राचीनकाळी तशी काही स्थिती नव्हती. धनधान्याबरोबरच सुखशांतीचीही समृद्धी असल्यामुळे 'काल'च्या शिक्षकाला 'पोटोबा'चा विचार शिवत नव्हता. समाज व शासन त्याला अशा विचारांपासून अप्रत्यक्षपणे अलिप्त ठेवीत होते; आणि म्हणूनच 'काल'च्या शिक्षकाने आपला डेरा वनवाटिकेमध्ये एखाद्या मनोरम निर्झरणी काठी दर्भाच्छादित उटजगृहामध्ये टाकावा, यात नवल नव्हते. समाजाला सर्व तऱ्हेचे पटू

क्रमांक ५५४३८ वि: निबंध
क्र. २०८ नों. दि. १५/३/०५१
दा. क्र. ५५११६

पुरविण्याची परंपरा प्राचीन ऋषीमुनींनी — 'काल'च्या शिक्षकांनी — अखंडितपणे, अव्याहत चालविली याची साक्ष पौर्वात्य आणि पाश्चात्य जुन्यानव्या ग्रंथांनी दिली आहेच !

'काल'ची दृष्टी 'वांढचाळ' नव्हती

समाजाचे उद्गाते, उद्बोधनकर्ते आणि निर्माते म्हणून शिक्षकांची त्या काळी ख्याती होती. तशीच त्यांची शैक्षणिक दृष्टीही तितकीच व्यापक, विशाल व वास्तव होती. धनुर्विद्येबरोबरच वेदवेदांतातील ऋचा पढवितांना व तत्संबंधीचे सम्यक ज्ञान देतांना जीवनाला सोडून 'वांढचाळ' जाण्याची प्रवृत्ती त्यांनी कधी ठेवली नाही. जीवनविन्मुखता स्वीकारून हात कपाळावर मारून न बसता स्वतःच्या चरित्र्याची, आत्मिकतेची, बौद्धिकतेची व मानसिक विकासाची पातळीच त्यांनी उच्च बनविली, प्रत्येक बाबीची चिंतना केली, चर्वणा केली व त्यानंतर जगात त्यांनी जे अनुभवले त्याची जगाला चवी दाखविली. सतत एक-दीड तप, कधीकधी दोनदोन तपे स्वसान्निध्यात शिष्यांना ठेवणाऱ्या प्राचीन शिक्षकाच्या शैक्षणिक दृष्टीची फारशी शहानिशा न करताही रवींद्रांच्या आजच्या शांतिनिकेतनाकडे किंवा फ्रान्समधील 'शांतिदासा'-च्या आश्रमाकडे बोट दाखवून ह्या प्राचीनतम अवशेषवजा प्रतीकांकडे पाहावयासा सांगण्याचे धाष्टर्य करता येईल !

'नको हे जीवित्त !'

'मोडेन पण वाकणार नाही'— ही स्वाभिमानाची वृत्ती जोवर कालच्या अध्यापकाने सोडली नाही तोवर तो मानवजातीचा मानबिंदु, किंबहुना मानधनच राहिला. राजेमहाराजे त्याच्या पायाशी येऊन लोटांगणे घालीत असत, त्याचे कारण तरी हेच ! नैतिकतेच्या अधिष्ठानावरूनच त्या काळच्या अध्यापकांची दृष्टी सर्वत्र फिरत होती. म्हणून राजसत्तेला त्यांच्यासमोर मान तुकवावी लागे. परंतु जेव्हा अध्यापक स्वतःतील 'स्व'ला पारखा झाला तेव्हापासून त्याच्यामागे 'र'ची रखरख सुरू झाली. 'र'बरोबरच 'ग' शिरला, अर्ध्या हळकुंडांत पिवळं होण्याची इच्छा शिरली; आणि 'र' आणि 'ग' मिळून त्याच्यात 'रग'

येण्याऐवजी उलट त्याची 'रग' जिरू लागली. 'स्व' गेला आणि 'र' आला म्हणून त्याच्या जीवनाचे स्वर विसंवादी बनले. 'स्व+र+ग' यांच्या घरसोडीच्या झमेल्यात त्याला बजबज जीवनापेक्षा मृत्यू बरा वाटून स्वर्गाची ओढ अधिक लागली !

**'उर्दू'च्या जमान्यात !**

ही बीजगणिती भाषा सोडून अधिक स्पष्टीकरण करूया. मध्यकालात आमचा अध्यापक वर्ग परकीय सत्तेच्या ताटाखालचे मांजर बनला. स्वाभिमान हीन मुद्रा अन् मदिरेच्या तुकड्यात विकला गेला. मोह हा माणसाला सौंदर्य, सेवा आणि सुविद्येला पारखा करीत असतो. यवनांच्या आक्रमणाने घाबरुन गेलेल्या शेंदाड शिपायांनी 'जी हुजूर'-ची री ओढून परक्यांचे पाय चाटण्याची प्रवृत्ती अंगिकारली. ती चांगली मुरली. त्यामुळे मध्यकालातील अध्यापक एतद्देशीय संस्कृतीला पोषक असे शिक्षण देऊ शकला नाही. छावण्यालावण्यांतून बोलली जाणारी खिचडी भाषा साहित्यात येऊन बसली व अध्यापक-वर्गाने 'जहांपाहा' ना खूष करण्यासाठी तिचे शिक्षण आम जनतेच्या 'बच्च्यां'ना 'मदरशा-मध्ये बसून दिले. शिक्षणाचे क्षेत्र अशा रीतीने मर्यादित झाले व शिक्ष-कांची शैक्षणिक दृष्टी आकुंचित झाली. उर्दू भाषा भारतातच तयार झाली असली तरी तिची प्रकृती फारसी आणि अरबीची आहे. तिच्या-तील 'चांद,' 'लैलामजनू' आमच्यांतील नाही. त्यातसा 'इश्क' आम्हाला 'अजीब-सा' वाटतो. असे असूनही राजदरबारात प्रतिष्ठा मिळवायची हावरी हाव बाळगणाऱ्या मध्ययुगीन शिक्षकांनी तिलाच चढवले, तिचेच शिक्षण दिले व तिचाच बडेजाव इतका वाढवला की, त्याच दृष्टीकोना-तून, त्याच प्रभावातून अगदी काल-परवाच्या सायंकाळपर्यंत उत्तर हिंदुस्थानाच्या बहुसंख्य प्रांतांत तिचीच मिराशी चालू होती. काही ठिकाणी अजूनही चालू आहे. वऱ्हाडसुध्दा या वर्चस्वातून सुटला नव्हता.

**मेकॉलेमहाराजांची कृपा**

साता समुद्रांवरून बाटमाऱ्या करीत आलेल्या बनियांनी जेव्हा आपले येथे बस्तान मांडले, तेव्हाही 'कालच्या कालखंडा'तील

शैक्षणिक दृष्टीत फारसा फरक पडला नाही. बुध्दी, धैर्य, शौर्य, वीर्य यांना बाह्यांगांतून ठेचण्यापेक्षाही अंतरंगात शिरूनच आंग्लमहाभागांनी आम्हाला पुचाट बनविले. मोहक व नखरेल विचारांच्या झिनियाची वासविहीन विदेशी फुले आम्हाला अधिक आवडली व आमच्या येथली शेवंती, मोगरा, आमची जाई, आमची सुपली, आमचा झेंडू–या साऱ्यांचा आम्हाला विसर पडला. आमचा अध्यापक तरी कसा सहीसलामत सुटणार या मोहिमेतून? 'पीछेसे आये वैसे आगे चलो' या मुल्लाच्या नमाजकथेप्रमाणे किंवा 'ऊपरसे आया डंडा वैसा करो' या हुकमी छक्कयापज्यातून सारीच राज्ययंत्रणा जेथे कार्यान्वित होती तेथे आमचाच मास्तरमाणूस अपवाद कसा राहील ? त्याच्याजवळ खरे म्हणजे शिक्षण आणि तत्संबधी दृष्टीच नव्हती. मेकॉलेमहाराजांची उसनवारी चालली होती. आणि म्हणूनच त्या मेकॉलेबुवाचे कारकूननिर्मितीचे स्वप्न आज एक शतकानंतर अगदी तंतोतंत सत्य झालेले आपण पाहतो आहोतच.

**'अ' पासून 'ज्ञ' शिकविणारा शिकणारा 'अज्ञ'**

आजच्या शिक्षकाच्या शैक्षणिक दृष्टीचा विचार करू गेल्यास थोडे निराशच व्हावे लागते. शिक्षकाची आजची शैक्षणिक दृष्टी अंशतः आशावादी, तर अंशतः निराशाजनक आहे. स्वराज्योत्तर कालखंडास 'आज' असे संबोधल्यास ह्या 'आज'च्या पोटात 'अल्सर'सारखे अनेक रोग आतल्याआत पोखरताहेत की काय याचे भय वाटायला लागते. आजचे जग जीवनसंग्रामाच्या झंझावातौवात स्वतःला स्थिर राखण्यासाठी धडपडत असून त्याला क्षणाची शाश्वती नाही. 'पर्वतावरचा डेरा' केव्हा उखडेल याचा कयास कुणालाच नसतो. जीवनाची मूल्ये विफलतेच्या टरफलांगत वाऱ्यावर उडतांना दिसतात. शिक्षणक्षेत्रातही हाच अनुभव येतो. भारताचा जगप्रिय पंतप्रधानही 'शिक्षक आणि शिक्षण' या विषयावर विचार करतांना मांझावायचा, तेथे बिचाऱ्या शिक्षकाची दृष्टी दूरवर पोहचली नाही तर तो त्याचा दोष नव्हे ! शासनावर, समाजावर दोषांचे खापर सर्वस्वी फोडता येईल असेही नाही. शिक्षकही काही अंशी जबाबदार आहे. मूलतः आजच्या प्राथमिक शिक्षकाचे स्तर बव्हंश उच्च

नसते, हा कटू पण सत्य अनुभव आहे. पदवीधर वा मॅट्रीक यांच्याइतके ज्ञान प्राथमिक शिक्षकाकडून कुणी अपेक्षिणारही नाही. मात्र आपल्या क्षेत्रापुरता तरी तो 'तज्ञ' असावा. प्रत्येक शब्दानंतर पूर्णविराम देणारे किंवा प्रत्येक मात्रेच्या बोडक्यावर अनुस्वाराला नेऊन बसविणारे आमचे काही बंधू पाहिले म्हणजे 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत बाराखडी शिकवून शिकणारे हे शिक्षक इतके 'अज्ञ' का ?– हा प्रश्न विचारावासा वाटतो. शैक्षणिक कार्याला वाहून घेण्याच्या जबाबदारीबरोबरच शिक्षकांनी बाहेरच्या जबाबदाऱ्याही आपणांवर ओढवून घेतलेल्या असतात. त्याची कारणे अनेक असली तरी ही स्थिती दारुण नाही, असे म्हणतच नाही.

**अभिनंदनपात्र अध्यापक**

पण, म्हणून काही निराश व्हावे, असे नाही. ठरीव वाटेने जाणारा आजचा शिक्षक न चुकता चालत असतो, हेही स्पष्ट सत्य आहे. परीक्षापद्धतीत पिचलेला हा प्राणी, परीक्षापद्धती नष्ट होत नाही किंवा तीत आमूलाग्र बदल होत नाही तोवर तरी, शैक्षणिक दृष्टीने कर्तव्य-तत्पर व म्हणून अभिनदनास पात्र ठरेल. कॅनडाचे शिक्षणतज्ञ डॉ. बिलँडो यांनी भारत देशातील शैक्षणिक स्तराची मागे नागपूरला प्रत्यक्ष पाहून स्तुती केली होती व ही गोष्ट मागे मा. दीनदयाल गुप्त यांनीही स्वानुभवांतून खरी असल्याची कबुली दिली होती. ह्यासारखी उदाहरणे काय दर्शवितात ? आमचा शिक्षक कामचुकार आहे असे यावरून खात्रीने म्हणता यावयाचे नाही. शिक्षकांकरवी अनेक सु-कृत्ये घडतात, असे दिसून येते. तेव्हा प्रहरानंतरच्या प्राचीच्या आगमनाचे हे सुचिन्ह असले पाहिजे. पहाटेच्या शीतल, सांद्र व सुमधुर अशा तुषारघाताखाली बसल्याचा आल्हाद अशा वेळी होणे साहजिक आहे. साकल्याने पाहिल्यास जीवनाच्या नवमूल्यांची जाणीव आजच्या बहुसंख्य शिक्षकांना निश्चित आहेच ! उद्याची शुभद नवक्षितिजे न्याहाळण्याचा त्यांचा अदम्य आशावाद व दुर्दम्य प्रयत्नवाद प्रतिकूलतेच्या फटकाऱ्यांनी पिचत असलेल्या परिस्थितीतही प्रस्फुटित होत असलेला त्याच्या जीवनात दिसून येतो. त्याला विशिष्ट आकार आलेला नसेल, इतकेच !

**आणि उद्याचे चित्र ?**

उद्याच्या शिक्षकांची शैक्षणिक दृष्टी विशिष्ट आकारयुक्त राहील. असलेला आजचा अंधार लोपणारच ! 'कालचा' दुवा 'उद्याला' जोडला जाईल. प्राचीन काळच्या अस्मितेचा एक डोळा व भारताच्या भविष्याची भाग्यरेखा रेखाटणारा दुसरा डोळा-दोहोंमिळून उद्याची शैक्षणिक दृष्टी तयार होईल प्राचीनतेचा उज्ज्वल व आदर्श अंश देश-कालस्वित्यनुरूप उद्याच्या आवश्यकतांशी संलग्न होऊन समन्वयवादी शिक्षणदृष्टीचा उपयोग उद्याचा शिक्षक करील; अर्थात या दृष्टीतून दिसणारे उद्याचे शिक्षणविषयक चित्र तितकेच मनोवेधक असणार यात शंका नाही !

उद्याच्या शिक्षणाची दृष्टी पाण्याबाहेर राहून पोहणे शिकणाऱ्या बहाद्दरांसारखी मुळीच राहणार नाही. जीवनाचा मागोवा शिक्षणाने घ्यावा, या मूलतत्त्वाला हरताळ न फासता प्रसंगी साध्यासाठी कोणत्याही विधायक साधनाच्या साह्याने अपेक्षिताप्रत जाण्याबाबत उद्याचे शिक्षण प्रयत्नशील राहील. भेदाभेदांच्या विषारी वादांपासून अलिप्त राहून इप्सिताची वाटचाल करण्याचे कार्य शिक्षण कधी सोडणार नाही !

**शिक्षकाचे विश्वव्यापित्व**

उद्याच्या जगात 'राजा' ही चीज इतिहासजमा होईल. 'युध्दस्य कथा रम्याः' – ह्या म्हणीची सत्यता प्रत्ययास येईल. युध्दाची देशालाच नव्हे, तर विश्वालाही शिसारी येईल. क्रांतियुध्दापेक्षा शांतियुध्दाची फार तर आवश्यकता प्रतिभासित होईल. विश्व आज वादांच्या वावटळीत गटंगळ्या खात असले तरी भारताने जगाला अनेकदा या वावटळीतून जसे वाचविले तसेच उद्याही वाचवील. हजारो संघमित्रा, हजारो महेंद्र चीन, जपान, बाली, लंका, ब्रम्हदेश, हिंदचीन, तिबेट, श्याम यांसारख्या देशांतच नव्हे तर विश्वाच्या कानाकोपऱ्यात पाठवावे लागतील. त्यांच्या हाती राहील बंधुत्वभावनेची मशाल व तीवर पेटत राहील शांतीची अहिंसात्मक निर्मल ज्योती ! ही ज्योती इतकी उज्ज्वल,

इतकी प्रखर राहील की, तीपुढे प्रतिगामी व ध्वंसक प्रवृत्तीचे पतंग, शलभ इत्यादिकांना प्राणानिशी मुकावे लागेल. दिवाभीते तर बाहेरच निघणार नाहीत.

– आणि हे हजारो प्रचारक कोण पुरवील ?

– भारतातला उद्याचा शिक्षक ! त्यच्या शैक्षणिक दृष्टीचीं प्रगती उद्यापर्यंत खात्रीने इतकी होईलच !

**विश्वबंधुत्वाची पाऊलवाट**

भौतिक आणि आत्मिक शक्तींच्या सहकार्याने राष्ट्रे जगतात. भौतिकतेवाचून राष्ट्र जगू शकत नाही, हे मान्य; परंतु भौतिकता म्हणजे काही इतिकर्तव्यता नव्हे ! भौतिकतेचा जन्म आत्मसंरक्षणात्मक आवश्यकतेतून झाला असला तरी तिच्यावर विश्वाची स्थायी मूल्ये निचिश्त होत नसतात. आत्मिकतेच्या पाठिंब्यावाचून भौतिकता यशस्वी होऊ शकत नाही. झालेली दिसली तरी तो आभास असतो.

नैतिकतेवर, नैष्ठिकतेवर आधारित आत्मिक शक्तीचा विकास हे उद्याच्या भारताचे प्रमुख लक्षण राहील. अखेर सत्यम् शिवम् सुंदरमच्या प्राप्तीसाठी मानवाची धडपड असते. या अंतिम प्राप्तीसाठी मानवाला प्रगतीची पाऊलवाट चोखाळावयाची असते. अखिल विश्वात आत्मस्वरूप व्याप्त असल्याचा अनुभव घेणे ह्यालाच विश्वबंधुत्व असे म्हटले जाते. ज्ञानेश्वरांचे 'विश्वव्याप्त घर' आणि तुकारामांचे 'विष्णुमय जग' हे याच अनुभवात मोडते.

मूठभर वरचे तथाकथित राजकारणी सोडले तर अखिल विश्वातील लोक आज शांती आणि सुव्यवस्था चाहताहेत. आजच्या धकाधकीच्या काळात प्रेम, दिलासा, आशा, विश्वबंधुता यांसाठी सारे लोक हपापलेले असून जेथून ते मिळेल तेथे त्याचे मन विसावण्यासाठी खात्रीने स्थिरावत असते.

उद्याच्या शिक्षणात या दृष्टीचे प्राधान्य राहील ! ही ध्येये मोठी असली तरी कोवळ्या मनांवर असले संस्कार उमटविणे काही कठीण नाही. उद्याचा शिक्षक या दृष्टीचा राहील. किंबहुना जे लिहिले त्याहूनही त्याच्या दृष्टीची विशालता विशाल राहील !

* * * * *

## २२ नैतिक बंधनांची चाड

आजच्या माणसाचे जीवन प्रायः विधिनियमांच्या बंधनांतून जखडलेले दिसून येते. प्रत्येक जागी हरेक बाब कायद्याच्या कक्षेतून करण्याची व पाहण्याची खोड आम्हास लागून गेली आहे. यामुळेच बरेचदा विधिनियमांची पायमल्ली आमच्याकडून होते.

कायदा हा समाजाच्या सुव्यवस्थेला पोषक व पूरक असला तरी कायदा म्हणजे साध्य नव्हे; अगदी दुय्यम स्वरूपाचे साधन आहे, हे विसरून चालता येणार नाही. आणि म्हणूनच कायद्याकडे हरघडी बोट दाखवून त्यावरच विसंबून राहणे युक्त नव्हे.

माणसाचे जीवन दुसऱ्याने सांगून जितके तयार होत नाही, त्याहून अधिक स्वतःचे जीवन स्वतःच माणूस तयार करू शकतो. स्वतः-लाच नैतिक बंधने लावून घेण्याची मात्र तयारी पाहिजे.

परंतु हीच नैतिक बंधनांची चाड बहुतेकांना नसते. खालून वरपर्यंत नैतिक बंधनांचा अभाव आढळून येतो. विशेषतः शहरी जीवनात हे प्रकर्षाने अनुभवास येते. प्रत्येक जागी अंग चोरून आपले घोडे पुढे दामटण्याची प्रवृत्ती बळावलेली याचमुळे दिसते.

जास्त कशाला ?... आपल्याच शहरात थोडा फेरफटका

मारून बघू या. आपल्याला खात्रीने काही अनुभव येतील...

हा पाहा सुटाबुटांतील अेक तरुण! पाहायला साजरा दिसतो. पण चौकातून ह्याने सायकल डाव्या बाजूने नेली नाही. ह्याचे म्हणणे असे की, पोलीसच येथे हजर नाही. तो असता तर हा नियम पाळणार; अथवा 'बेबंदशाही' करणार! ह्याने आणि ह्याच्या दोस्तांनी पोलीस असो-नसो, केव्हाही डाव्याच बाजूने सायकल काढायची सवय ठेवायला हवी; येथे कायदा दूर राहतो. नैतिक बंधन जवळचे पडते.

ही पाहा शाळकरी मुले. एका सायकलवर तीन-तीन जणांनी बसून जाणे हे यांना चांगले साधते. पोलीस दिसला तेव्हा मात्र उतरतात बाकी! यांचे नियम पाठ आहेत. "चौक आला की २५ पावले अंतरावर उतरायचे. पोलीस दिसला तेव्हाही तसेच." ह्या मुलांना नैतिक बंधनांची जाणीव नाही असे कसे म्हणायचे? पण नियम धाब्यावर बसविण्यात यांना आनंद! कारण नियमावली मुखोद्गत आहे. वाद घालायला तयार, कधी हार जाणार नाहीत!

मार्चचा परीक्षा-हंगाम सुरू आहे. आमच्या शेजारी लग्न आहे. त्यांनी परवानगी काढून रात्रभर लाऊडस्पीकर चालू ठेवला आहे. पण तक्रार करूनही अभ्यासू मुलांना होणारा त्रास कमी झाला नाही. लग्न-घरच्या मंडळीचे म्हणणे असे की, "आम्ही वाटेल तेवढा आवाज ठेवून वाजवू. आम्ही नियमाप्रमाणे परवानगी काढली आहे." आता ह्या लगीनघाईतील वरात्यांना कुणी शिकवायची नैतिक बंधनांची चाड?

सायंकाळची आणि सकाळची आमची अभ्यासाची वेळ आणि आमच्या घरमालकाच्या घरमालकाच्या घरच्या रेडिओची वेळ एकच यावी हा दैवदुर्विलासच म्हणावा! 'अहो जरा हळू'- असे म्हणण्याची सोय नाही. कारण ते मालक आहेत. त्यांच्या घरी ते नाचतील, उडतील, रडतील, हवे ते करतील. म्हणायला गेल्यास खेकसतील. इतकेच नव्हे तर अधिक आवाजात आपल्या मर्जी रेडीओवरून वेळकाळ न पाहता 'सिलोन'ची जाहिरात करतील किंवा 'सिनसिनाकी बुबला बू' अशी गाणी सुनावतील! ह्या 'धन्यांना' कोणत्या कारखान्यात नेऊन मरडावे,

म्हणजे त्यांना नीतिबंधने अवगत होतील ?

सायंकाळी एखाद्या सडकेवरून पायी चला किंवा सायकलीवरून चला. सायकलीवरून तर तुम्ही चालूच शकणार नाही बहुधा ! चाललात तर तुम्हास उतरावेच लागेल. कारण......कारण साधे आहे. आमचे कॉलेज–तरुण रिक्षावाल्यांसारखेच भररस्त्यात चांडाळ–चौकड्या जमवून गप्पांना ऊत आणतात. कॉलेज–कन्यकांची अलभ्य दर्शने घेण्याची ही एकमेव स्थाने असल्याचे तेथे सांगण्यात येते. परंतु रहदारीला यामुळे अडथळा येतो याची दाद त्यांना नसते, असे कसे म्हणावे ? त्यांना नियम माहीत असतात. हटो–हटो म्हणणारे पोलीस आले की पांगापांग होते, पण पुन: येरे माझ्या मागल्या ! बहुतेक साऱ्याच रस्त्यांची ही गत आहे.

काही प्राथमिक शाळांत सडास व मुत्रीघरे आहेत. पण शाळेला कंपाऊंड ठीक नसल्यामूळे बऱ्याच सडासांचा उपयोग लोक करतात. मुत्रीघरांचाही उपयोग लोक करतात. मुत्रीघरांचाही उपयोग संडासासारखा लोकांनी करावा ना ! ह्या संडासांचा एक तर उपयोग लोकांनी करायला नको, आणि केला तरी, असलेली 'थोडी'शी वेशीला टांगून तरी करायला नको. ह्या घाणीला दूर सारण्यासाठी, ह्या घाण लोकांना नीतिबधने शिकविण्यासाठी शिक्षक कोठून आणायचे ?

एका प्राथमिक शाळेत छोट्याछोट्या मुलांनी हौस म्हणून खो–खो खेळावयाला खांब आणले. दुरून खेड्यातून ! पण कुणा चोराने ते लांबवले ! लहान मुलांचा आनंद हिरावणारा हा चोर 'चार' नसून 'छचोर' असला पाहिजे. ह्या जीवघेऊ 'गमती' करणाऱ्यांना नैतिक बंधने शिकविण्यासाठी शाळा काढण्याची पाळी न येवो !

एके दिवशी माझ्या सायकलीला एका पतंगाचा (मांजानेमळलेला) दोरा अडकला. सायकल चालवता चालवता मी तो काढून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यात बोट कापले. दोरा तुटला म्हणून 'पतंग-मालकां' नी मलाच शिव्या हासडल्या. पतंग-मालक त्या भागातील चार-चार लेकरांचे बाप होते हे विशेष. काही जागी चौक व सडका लहान असतात. तेथे

मोठमोठ्यामाणसांनी पतंग उडवण्याचा खेळ खेळावा, जाणाऱ्यायेणाऱ्यांना त्रास अन् उलट शिव्या ! रस्त्यात विटीदांडू खेळणाऱ्या मुलांनाच दोष देऊन नाही चालणार !

कित्यके नगरींत असे अनेक चमत्कार रोज पाहायला मिळतात. जोवर कायद्याची मिराशी आम्ही चालवण्याचा बडेजाव आणून नैतिक बंधनांची चाड न ठेवता त्यांना पारखे राहू, तोवर तरी हे 'चमत्कार' पाहण्याचे आमच्या भाग्यात आहेच आहे !

* * * * *

## १२ खेडी आणि वाचनालये

हिंदुस्थानचा प्राण खेड्याखेड्यांतून पसरलेल्या बहुजन-समाजांत आहे. खेड्यांची सर्वांगीण उन्नती म्हणजेच भारताची प्रगती होय. हा दृष्टिकोन समोर ठेवूनच पूज्य बापूंनी आम्हाला 'खेड्याकडे चला' असा महामंत्र दिला; आणि आनंदाची गोष्ट ही की, ह्या महा-मंत्राकडे अलीकडे जनता आणि सरकार यांचे लक्ष वेधले गेले आहे. मध्यवर्ती तथा प्रांतिक सरकारांनी खेड्यांच्या सर्वांगीण विकासाच्या योजना आखल्या असून त्यांची अंमलबजावणीसुद्धा हळूहळू होत आहे.

आजवरच्या आमच्या सर्व दु:खांस व अवनतीस कारण म्हणजे आमचा अशिक्षितपणा होय. म्हणून निरक्षरांना साक्षर करण्याकडे सर-कार बव्हंशी लक्ष पुरवीत आहे. साक्षरताप्रसाराचे वर्ग खेड्याखेड्यांतून चालवले जात आहेत. अज्ञ जनतेला ज्ञानचक्षू देण्याचा महायज्ञ सुरू झाला आहे.

खेड्यांतील लोक थोडे लिहूवाचू लागले म्हणजे त्यांना, आपला शैक्षणिक दर्जा वाढविण्याकरिता सोपी पण योग्य अशी पुस्तके वाचावयास मिळणे अत्यावश्यक आहे. खेडेगावात पुस्तकांची दुकाने नसल्यामुळे लोकांना ती घेता येत नाहीत आणि इकडून तिकडून मिळाले

तर ते एखाददुसरेच पुस्तक मिळते. खेड्यापाड्यांत पुस्तके पोचण्याच्या सोयी झाल्या तरी तेथील वाचनालयांना त्या परवडणाऱ्या असतीलच असे नाही.

अर्थात ही अडचण दूर होण्यासाठी खेड्यांतून वाचनालये असणे जरूर आहे. वाचनालय म्हटले म्हणजे पुस्तके, पत्रके, आलमाऱ्या, खुर्च्या, मेज वगैरे गोष्टी लागणारच ! हे सर्व करण्यासाठी खर्चही खूप करावा लागेल. आणि एवढा मोठा खर्च खेड्यांतील गरीब लोकांना झेपणे शक्य नाही.

अशा स्थितीत थोडक्यात, सोपी व कमी खर्चाची अशी वाचनालयाची खालील योजना खेड्यांतून सुरू करणे सहज शक्य होईल. शिक्षक व कार्यकर्ते या बाबतीत पुढाकार घेऊ शकतील.

वाचनालयात प्रथम पुस्तकांचा संग्रह हवा असतो. हा संग्रह पुढील मार्गाने करता येईल—

गावातील थोडेफार लिहितावाचता येणाऱ्या बहुतेक माणसांच्या घरी एक ना एक तरी ( धार्मिक वा अन्य ) पुस्तक असतेच ! ते बहुधा केव्हाच वाचून झाले असते आणि ते बहुतेक पेटीत कुजत पडले असते. अशा लोकांच्या घरी जाऊन वाचनालयाची योजना प्रेमाने समजावून द्यावी व जुनी, उपयोगात नसलेली पुस्तके देण्याची नम्र विनंती करावी. असे केल्यास कितीतरी पुस्तके जमविता येतील. त्यांतून योग्य ती पुस्तके वाचनालयात ठेवावी.

दुसरा प्रश्न वर्तमानपत्रांचा. देशाच्या, प्रांताच्या हालचाली व घडामोडी यांचे स्थूल ज्ञान होण्यासाठी खेडूतांना वर्तमानपत्रे आवश्यक असतात. वाचनालयात ती पैशाभावी बोलावणे अशक्य असते. परंतु गावातील काही थोड्या लोकांकडे मात्र ती येत असतात. अशा लोकांना, 'तुमचे पत्रक वाचून झाल्यावर वाचनालयात देण्याची कृपा करावी' अशी विनंती करावी. अशा तऱ्हेने गावात येणारी बहुतेक वर्तमानपत्रे थोडी उशीरा का होईना, वाचनालयात जमा होऊन सर्वांना वाचावयास मिळतील.

मेज, खुर्च्या यांसारख्या वस्तूंकडे पैसा खर्च करण्यापेक्षा साध्या तरटाचीच व्यवस्था करावी. किरकोळ खर्च भागाविण्यासाठी साधारण ऐपतीच्या लोकांकरिता थोडीफार वर्गणी ठरवावी.

वाचनालयाची आर्थिक स्थिती सुधरविण्यासाठी धनिक लोकां-कडून देणग्या मिळवाव्यात.

अशी वाचनालये खेड्यांतून सुरू झाल्यास जनतेचा फायदा तर होईलच, परंतु सरकारचेही बरेचसे श्रम व खर्च वाचेल. सरकारचे उत्तेजन मात्र मिळाले पाहिजे.

हा प्रयोग मी स्वतः इ. स. १९४९ पूर्वी काही खेड्यांतून करून पाहिला व तो यशस्वीदेखील झाला.

* * * * *

## १३ सिंधी जमातीचे सणवार

सिंधी लोकांमधील सणवार मराठी लोकांपेक्षा काही बाबतींत निराळे आहेत. भारतात अशा अनेकविध रूढीरीतींनी एक वैचित्र्य निर्माण झाले आहे, हे भारत देशाचे एक वैशिष्टयच म्हणावे लागेल. सिंधी जमातीतील काही सणवारांचे मासले पुढे दिलेले आहेत.

**अनमटचा**

सिंधी लोकांचा हा दिवस अन्नपरिवर्तनाचा (Change fo food) अथवा उपवासाचा दिवस म्हणून मानण्यात येतो. जन्माष्टमीच्या नंतर १४ दिवसांनी हा सण येतो. वर्षातून एकदा येणाऱ्या या दिवशी अन्न खाणे वर्ज्य मानले जाते. गहू, ज्वारी वगैरे मुख्य धान्ये एकदम वर्ज्य असली तरी मूग, मटकी यांसारख्या धान्यांचा क्वचित अपवाद केला जातो.

**लाल लोई**

'लाल रंगाची गादी' असे या सणाला म्हणता येऊ शकेल. लोई हा शब्द मराठीत आहे. ज्याला 'कॅंप फायर' म्हणतात, तसलाच प्रकार या सणात असतो. वस्तुत: लाल लोई म्हणजे सिंधी लोकांची 'होळी' होय. इतकेच की, ही लाल लोई नेमकी जानेवारीच्या १३–१४

तारखांना येते व आपली तीळसंक्रांतही त्याच वेळी येते. लाल लोईच्या सणात १३ ला सायंकाळपासूनच होळी पेटवून रंग भरला जातो. प्रामुख्याने मुलांच्या उत्साहाचा हा सण आहे. सायंकाळनंतर नाचणे, बागडणे, खेळणे, गोड मिठाया वाटणे, नारळाच्या खोबऱ्याची शेरणी देणे इत्यादि कार्ये मुले करतात. मुले या खर्चासाठी हिंडून वर्गण्या मागतात. चांगले लोक दिसले की त्यांचा पिच्छा पुरवून 'लाल लोई'ला काही द्या, म्हणून विनवतात व माणसेही कौतुकाने पैसा दोन पैसे वा आणा दोन आणे शक्यतेप्रमाणे देतात. रात्री १२ वाजेपर्यंत १३ जानेवारी रोजी हा आनंदोत्सव मुले उत्साहाने साजरा करतात. वर्गण्या जमविण्याची मोहीम त्याअगोदर सुमारे १५ दिवस तरी चाललेली असते.

लाललोईच्या या महोत्सवात गावात ठिकठिकाणी खड्डे खणलेले आढळतील. या खड्ड्यांमध्ये अग्नी पेटविलेला असतो. रात्रभर ह्या 'होळ्या' पेटतात. ह्या होळ्यांमध्ये लाकडे वगैरे पेटण्यासाठी शहरी मुले लाललोईच्या वर्गण्यांचा काही भाग खर्च करतात. खेड्यापाड्यांतील मुले लाकडे जमवितात. काही काही वेळा मुलांच्या हडेलहप्पी वोरणाला शाळेचे लाकडी सामान, घरांचे दरवाजे, बाजा, खुर्च्या यांचा बळी जातो. मुले हे सामान चोरून नेतात व 'लाललोई'च्या होळीत टाकतात.

**मकर संक्रमण**

तिळाचा सण म्हणून सिंधी जनांमध्येही हा सण पाळला जातो. मात्र त्याचे स्वरूप थोडे निराळे आहे. मराठी लोकांप्रमाणे तीळगूळ देण्याची पद्धती सिंधी लोकांत नाही. घरी कुणी आले तर देतीलही; पण प्रामुख्याने या सणात तीळगुळाची मिठाई मुलींना देण्याची व पाठविण्याची प्रथा सिंध्यांत विशेष आहे.

**थदडी**

सिंधी लोकांचा हा एक 'थंडा' सण आहे. जुलै–ऑगस्टच्या दरम्यान हा सण येतो. दिवसभर घरात अग्नी पेटविण्याचे या सणाच्या दिवशी वर्ज्य मानले आहे. आधल्या रात्रीच बहुतेक खाद्यपदार्थ शिजवून

ठेवले जातात व ते थंड पदार्थ दुसऱ्या दिवशी खाल्ले जातात. दूध, दही यांसारखे थंड पदार्थ या दिवशी विशेषेकरून सेवन केले जातात. दैनंदिन जीवनात संसाराचा उन्हाळा तापत असतांना या सणाच्या निमित्ताने शांतिपूर्ण थंड वातावरणाचा अनुभव आणि संदेश वर्षातून एकदा घेतात, हे औचित्यपूर्णच म्हटले पाहिजे !

होळी व दिवाळी

होळी हा सण सिंध्यांमध्ये रंगदृष्टया पाळतात. पण, आता सगळीकडेच रंगाचे प्रमाण कमी झालेले आहे. सिंध्यांमध्ये रंगफेक आता फारशी चालत नाही. मुलांना फार तर त्यात रस वाटतो. कृष्णजन्माचा सण सिंध्यांमध्ये पाळतात. मराठी लोकांपेक्षा त्याचे स्वरूप फारसे निराळे नाही. दिवाळी हासुद्धा दोन्ही समाजांना सामान्य असा सण आहे. सिंधी लोक दिवाळीच्या वेळी लक्ष्मीपुढे चौकोनी दिवे लावतात. ती एक विशेष गोष्ट आहे. लक्ष्मीपूजनासाठी चांदीचा मान विशेष आहे. त्या चांदीवर दूध शिपडतात.

दिवाळीच्या वेळी सुकलेल्या धांडयांच्या टोकांना चिंध्या गुंडाळून टेंभे करतात. हे टेंभे तेलाने भिजवून घेतात. पुरुष व मुले एकत्र जमतात आणि टेंभे पेटविले जातात. सर्व टेंभे घराबाहेर जाळतात व त्यांच्याभोवती फेरी घालतात आणि जवळून जातात. दिवाळीचा सण सिंध्यांमध्ये सातसात दिवस पाळला जातो व तो मोठा आनंदात पार पडतो.

याशिवाय श्राध्दादि विधी होतात. श्राद्धात खीर या पदार्थाचा मान असतो. राष्ट्रीय सण सिंधी लोकांनी उचलले आहेत. २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, गांधी जयंती इत्यादि राष्ट्रीय सण आता संपूर्ण भारतात सामान्यपणे साजरे केले जातात ! सिंधी लोकही हे राष्ट्रीय सण पाळतात !

* * * * *

## २४ सौंदर्याची दृष्टी आणि स्वच्छता!

जीवनाच्या अंतिम उद्दिष्टाला सत्यम्, शिवम्, सुंदरम्ची समष्टी म्हणून संबोधण्यात येते. परंतु अशा तऱ्हेच्या जीवनविषयक कल्पना वाङ्मयीन भाषेतच फक्त पाहावयास मिळतात. त्यांचा प्रत्यक्ष अमल जीवनात कितपत होतो ह्याचा विचार करू गेल्यास मन विषण्ण होते. मानवप्राण्याच्या जीवनाला विशिष्ट स्वरूपाचा अंतिम साध्य-बिंदू आहे असा आमच्या भारतीय संस्कृतीने निर्वाळा दिला आहे. विकसनाच्या रोखाने प्रगत होतहोत गेल्यास सत्यम्, शिवम्, सुंदरम्च्या अंतिम इप्सिताला प्राप्त करून घेणे हे मानवी जीवनाचे अंतिम साध्य आहे, हाच त्यातला प्रमुख सूर होय.

....परंतु आम्ही या दृष्टिकोनातून जीवनाचा विचार करू तेव्हा ना? जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच मुळी आमच्याजवळ नाही. इतिहासाची पृष्ठे ज्या समाजजीवनातून लिहिली जातात, निर्माण होतात, ते सामाजिक जीवन तर आज अत्यंत विकृत झालेले दिसून येते. कवी कुसमाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे 'हे जीवन कसले ?– ही मरणांची माला !' अशा स्वरूपात आज आमच्या जीवनाचा परिचय दिला जाऊ शकतो.

यशस्वी जीवनाच्या कल्पना एखाद्या भल्यामोठ्या घबाडागत नाहीत. साध्या साध्या गोष्टींमध्ये व्यवस्थितपणा असणे, ज्याला चांगले म्हणून संबोधण्यात येते त्या चांगुलतेच्या साच्यातून जीवनाला ढाळणे ह्या बाह्य साधनांद्वारे मनाला, बुद्धीला अन् शरीराला विकासाची कास धरावयास लावणे ह्याशिवाय आदर्श जीवनाच्या कल्पनेत दुसरे येते तरी काय ?

आमचे जीवन चांगले व्हावयासाठी, आमची प्रत्येक लहान-सहान, साधीसुधी गोष्टदेखील विकसनाची जन्मदात्री असावयास हवी. साध्या साध्या गोष्टीतही मनास आल्हाद वाटेल, समाधान लाभेल अशी आमची वागणूक असायला हवी.

'सौंदर्याची दृष्टी आणि स्वच्छतेची चाड' हीदेखील वरील विचारधारणेच्या साच्यातील एक साधी गोष्ट आहे. व्यावहारिक जीवनाला स्वच्छतेची नितांत अवश्यकता आहे. अस्वच्छतेचे अनिष्ट परिणाम सर्वांना विदित आहेतच.

स्वच्छतेची जननी सौंदर्याची दृष्टी आहे. सुंदर तेवढे हवेहवेसे वाटणे म्हणजेच निर्मलता, शुद्धता अन् स्वच्छता ह्यांची आवड असणे. सौंदर्यासंबंधीच्या मोठमोठ्या गोष्टी वा लांबलचक चर्चा दूरच्या आहेत. परंतु छोट्या छोट्या गोष्टी जरी आमच्या सौंदर्यदृष्टीतून संरक्षिल्या गेल्या तरी फार मोठे काम होण्यासारखे आहे. पण दुर्दैव असे की आमच्यातील अशिक्षितच नव्हे तर शिक्षित लोकांतदेखील ह्या बाबींचा अभाव प्रकर्षाने दिसून येतो.

...पण अधिक प्रस्तावना कशाला ? प्रत्यक्ष पडताळा खालील उदाहरणांवरून येईलच. या नमुन्यांवरून मला वाटते, वाचकांचे देखील हेच मत होईल.

एका आडव्या रस्त्याला ओलांडून उभा रस्ता समोर पळतो. त्याला आम्ही चौक म्हणतो. ह्या चौकाच्या चार कोपऱ्यांवर प्राय: आरसे रेडिओ असलेली चार ढंगदार दुकाने असतात. त्यांना आम्ही पानांचे ठेले म्हणतो. त्या ठेल्यांच्या समोर सूटबूट घातलेले, उलटे केस

केलेले आणि सायकलला टेकून असलेले एखादे टोळके असते. त्यांना आम्ही कॉलेज-कुमार म्हणतो. पानांचे पानदान या टोळक्याच्या समोरून कीर्तनातील आरतीच्या कापूरदानासारखे फिरते. प्रत्येकाच्या गालात पानदानातला पानविडा जाऊन बसतो; आणि थोड्याच वेळात सिमेंट-कॉंक्रीटच्या स्वच्छ रस्त्यावर पानांचा पिक फेकल्याचे आवाज येतात- "पचक् पचक् !" रस्त्यावरून येणाऱ्याला जणू वाटावे-"ह्या रक्ताळलेल्या जागी एखादा अपघात तर झाला नाही ना ?" एखादी सायकल त्या पिकावरून गेली तर तिचे टायर ते 'रक्त' आणखी समोर पसरवीत नेते. पानांनी थोबाडे रगडून पच् पच् थुंकीने रस्ता रंगवणारे रिक्षेवाले आणि वर उल्लेखिलेले कॉलेज-कुमार एकाच माळेचे मणी म्हटले पाहिजे. परीटघडीच्या शर्टाला एक सुरकुती पडली तर बरे न वाटणाऱ्या आमच्या ह्या मित्रांना काय ही स्वच्छता अन् सौंदर्याची चाड !

एखाद्या सिनेमागृहाच्या आत प्रविष्ट व्हा. रिकामी खुर्ची बघा अन् तीवर बसायला जा. मागचे महाशय समोरील खुर्चीवर तंगड्या ताणून बसलेले आढळतील. मागच्या महाशयांनी आपली पायधूळ त्या-समोरील सीटवर आधीच झाडून ठेवलेली असते. त्या पायधुळीचा रंग नव्याने बसणाऱ्यांच्या कपड्यांना अनायासेच लागतो !

तसेच सिनेमाघरात फरशीवर पानांचे पिक थुंकणे भरमसाट स्वरूपाचे असते. बोलपटगृहातून बाहेर पडल्यावर पान न खाणाराही जेव्हा आपल्या पायजाम्यावर लालसर पिकाचे घाणेरडे डाग पाहतो, तेव्हा तो चाटच होतो.

बस, रिक्षा, सायकली वा मोटारी यांत बसलेले काही शिष्ट ('सभ्य!' या अर्थी बरं का!) पचकन् खाली थुंकतात किंवा खाकरून हिरवे ठसे टाकतात. या थुंकीचा प्रसाद पायदळ वा सायकलस्वारांना तर मिळतोच, पण रस्त्यावरही त्यांच्या गमनाची खूण उमटते.

सार्वजानिक स्थानी अशा तऱ्हेने थुंकण्याची ही अत्यंत घृणास्पद प्रथा पाश्चात्यांत आढळून येत नाही. ह्याला कारण त्यांची सौंदर्यदृष्टीच म्हणावी लागेल. पान खाण्याची प्रथा पण तिकडे प्रचलित नाही.

तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या, थोडे शिकलेल्या बाईला घरचा कचरा कचरापेटीत नेऊन टाकायला शरम वाटते. (चार भिंतींच्या आतले काम करतांना तिला कोणी पाहिले तर बिचारीची लाजून मुरकुंडीच वळेल की काय, कोण जाणे ! ) घर स्वच्छ करणारी ही स्वच्छताभोक्ती बाई, घरातला कचरा कचरापेटीत नेण्याचे श्रम वाचविण्यासाठी कोणाचे लक्ष नाही असे पाहून झट्‌कन रस्त्यावर फेकून देते. रस्त्यावरून जाणाऱ्यांना धुळवडीची आठवण बहुधा त्यावेळी येत असावी !

फिरावयास जाणे हे नागरी जीवनातील एक पुढारलेले चांगले लक्षण समजले जाते. निरनिराळ्या बागांमध्ये निरनिराळे कंपूकंपू सायंकाळच्या वेळेला बसलेले दिसतील. नागपूरच्या नाना न्हाव्यापासून तर नामवंत नामदारांपर्यंत चकाट्या जाऊन पोचतील. ह्यांची बैठक उठल्यानंतर थोडे त्यांच्या बैठकीच्या जागी जाऊन बघा. तेथे गवताचे पुंजके तुम्हास दिसून येतील. बसणारांचे हात गवत कुरतडण्याचे काम करीत असतात, त्यात त्या कंपूवहाद्दरांचा बिचाऱ्यांचा काय दोष? बागेच्या सौंदर्यात अशा ठरीव उंचीच्या गवताने भर पडत असते हे लक्षात नको का असायला ? मान्यवर राजेंद्रबाबूंचा बगीचा नुकताच दिल्लीच्या लोकांसाठी खुला करण्यात आला, तेव्हा लोकांनी त्याला उध्वस्त करण्याचा जणू घाटच बांधला होता, हे ताजे उदाहरण वाचकांच्या स्मरणात असेलच. तसलेच प्रकार कमीअधिक प्रमाणात सर्वच बागांच्या बाबतीत घडून येतात.

चांगल्या बागांमधील देवळे, सुंदर इमारती किंवा यात्रा तीर्थक्षेत्रांतील मठमंदिरांकडे जरा बारकाईने बघा. त्यांच्या साऱ्या भिंतींवर रंगीत खडू, कोळसे, रंग वा नखांनी किचडलेले दिसते. काहीतरी अक्षरे लिहिलेली असतात. त्यात नावांचा भरणा जास्त असतो. अशा सुंदर स्थळांचे सौंदर्य बिघडवून पावित्र्याचे विडंबनच करणे नव्हे का हे ? लिहिता येत नाही अशा अशिक्षितांचा हा प्रताप होय असे म्हणण्याची हिंमत होईल कुणाला ?

देवळांच्या भिंती किचडणाऱ्या लोकांपेक्षाही भयंकर असा एक

वर्ग आहे. ह्या वर्गात कोणते लोक येतात हे सांगणे कठीण आहे ! ह्या वर्गातील लोक सुबर (!) अक्षरात, छान (!) भाषेत, सुंदर (!) कलायुक्त (!) चित्रांत आपली चातुरी ओतण्याचे काम, संडास, रेल्वेचे डबे, भिंती, दारे वगैरे ठिकाणी करीत असतात. हे चतुर चितारी अशिक्षित असतात काय?

— आणि "आम रास्ता नही" अशा पाटीचे "आम सस्ता नही" असे रूपांतर करणाऱ्या टारगटांचा आणखी एक गटही सर्वांच्या परिचयाचा आहे. भिंतींवरील जाहिरातीचे स्वरूप विकृत करणे, साईनबोर्डस्-मध्ये मजेदार बदल करणे वगैरे बाबतीत हा वर्ग एक नंबरचा पटाईत असतो. रस्त्याने येणाऱ्याजाणाऱ्या गावापरगावांतील सर्वांनीच शहर-सौंदर्या-(!)ची कल्पना ह्या सहज नजरेत पडणाऱ्या उपद्व्यापांवरून करावी काय ?

आज अन्नधान्याची समस्या तीव्रतेने आपले स्वरूप दावीत आहे, ह्याची कल्पना असूनही होस्टेलमध्ये थोडे थंड झालेल्या अन्नाच्या थाळचा फेकणारे खुशालचेंडू आढळून यावेत ह्याचे वाईट वाटते; पण कल्पना असूनही अन्नाची खरड, शिळेपाते तुकडे व भाताची भरमसाट शिते घाणपाण्याच्या नाल्यांनी सोडून देण्यात प्रामुख्याने मध्यमवर्गीय जाणत्यासवरत्या ट-फ येणाऱ्या बायकांचाच समावेश असतो, हे कटू असले तरी सत्य आहे. पोटाला चिमटा घेऊन राहणाऱ्या गरीबगुद्यांच्या घरची शिते बाहेर पडण्याची अशक्यताच असते. सांजेपुरते हातावर आणून पानावर खाणाऱ्या गरीबांच्या घरचा अनुभव हा असा आहे. अन्नधान्याच्या आजच्या महर्गतेच्या व दुर्मिळतेच्या काळात वरील गोष्ट निंद्य तर आहेच पण स्वच्छतेच्या दृष्टीनेही अत्यंत गैर आहे.

अशी एक ना दोन—शेकडा उदाहरणे देता येतील. अशा तऱ्हेच्या साध्या साध्या गोष्टींच्या बाबतींतही सौंदर्यदृष्टी अन् स्वच्छतेची चाड ह्यांना आम्ही पारखे झालो तर.... तर आम्ही शिकून न शिकून सारखेच, असे म्हणण्याचा कटू प्रसंग येईल; दुसरे काय ?

* * * * *

## २५ लंका

सिलोन हा आमचा शेजारी देश ! आम्हाला त्याच्याबद्दल उत्सुकता, आपुलकी अन् आस्था असणे साहजिक आहे. या देशाचे व आमचे संबंध फार जुने आहेत. भगवान रामाने महात्मा रावणाच्या ज्या भूमीत संचार केला होता, जेथे हनुमंताने आपले शौर्य दाखविले होते, त्या भागाचे दर्शन या लेखाद्वारे घेता यायला हरकत नाही.

**सिंहलद्वीप**

भारत हा खंडप्राय देश, तर आपल्या देशातील वऱ्हाडच्या चार जिल्ह्यांएवढे क्षेत्रफळ सिलोन देशाचे ! ही जुनी लंका सिंहली लोकांची; म्हणून 'सिंहलद्वीप' नावाने प्रसिद्ध झाली. सिंहलद्वीप या नावाने अनेक कथांमध्ये हे बेट येत राहीले. लोककथांची साक्ष त्यासाठी आहे. परक्या लोकांनी हे लांबलचक नाव उच्चारता येईना, म्हणून सिलोन हे नाव या देशाला दिले.

**बुद्ध व बंगाली राजे**

सुमारे २२०० वर्षांपूर्वी बुद्धधर्मप्रचारक राजा अशोक ह्याने आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा ह्या दोघांना धर्मप्रचारार्थ लंकेत पाठविले होते. या दोघांनी या देशात बुद्धधर्माचा प्रचार केला.

सुमारे २५०० वर्षांपूर्वी विजय नामक बंगाली राजाने लंका जिंकली. त्यानंतर त्याचे वंशज त्या बेटात राज्य करीत होते. काही वर्षे मद्रास भागातील तामीळ राजांनीही या बेटावर राज्य केले.

**न्यायप्रिय इलार राजा**

तामीळ राजा इलार हा न्यायासाठी प्रसिद्ध होता. त्याने राजवाड्यातील आपल्या खोलीजवळ एक घंटा बांधून ठेवली होती. ज्याला राजाकडे दाद मागावयाची असे तो ती दोरी ओढून घंटी वाजवी. त्यामुळे राजा लगेच त्याला बोलावून त्याची तक्रार ऐकत असे. हा राजा इतका न्यायनिष्ठुर होता की, एकदा त्याने खुद्द आपल्या मुलास देहान्ताची शिक्षा दिली.

**अरब, पोर्तुगीज, डच व इंग्रज**

इ. स. ९०० नंतर अरब व्यापारी या बेटात येऊ लागले व तेव्हापासून मुसलमानांचे प्राबल्य वाढले. सुमारे ५०० वर्षे ही स्थिती व कायम राहिली. त्यानंतर पोर्तुगीज आले. त्यांनी मुस्लीमांना हुसकावून स्वतःचा धर्मप्रसार केला. पोर्तुगीजांनी जुलुमाने अनेकांना बाटवले. देवळे फोडली. ख्रिस्ती लोकाशिवाय इतरांना बापजाद्यांच्या संपत्तीचा वारसा मिळू नये असा कायदाच केला. त्यामुळे बऱ्याच जणांनी धर्मान्तर केले.

पण पोर्तुगीजानाही गचांडी देणारा राजा राजसिंह जिंकल्यामुळे राज्यकर्ता झाला. १७ व्या शतकात डचांचा अमल सुरू झाला. १९ व्या शतकाच्या आरंभी इंग्रजांनी डचांना हटवून आपले राज्य सुरू केले-परवा परवा सिलोन स्वतंत्र होईपावेतो !

**संस्कृतिसंमेलन**

सिलोनमध्ये सिंहली लोक व तामीळ लोक जास्त आहेत. सिंहली लोकांची सिंहली भाषा संस्कृतपासून निघाली आहे. तामीळ लोक मद्रासच्या दक्षिण भागातील मूळचे असून ते सिलोनमध्य उत्तर भागात येऊन वसले. त्यांची भाषा तामीळ आहे. तामीळ भाषा द्राविडियन समजली गेली असली तरी ती संस्कृतपेक्षाही जुनी समजली जाते. इतके मात्र खरे की ती भाषा सुमारे ३ हजार वर्षांपूर्वीची असून तिचे वाङ्मय

फार समृद्ध व संस्कृतसदृश शब्दांनी युक्त आहे.

सिंहली लोकांचा धर्म हिंदू आहे. बौद्धांची लोकसंख्या या देशात अर्ध्याहून अधिक आहे. सिंहली लोक कासवाच्या पाठीची फणी डोक्यावर शोभेसाठी म्हणून अडकवितात. बौद्धभिक्षू पिवळ्या रंगाचे कपडे नेसतात. उजवा खांदा उघडा ठेवून ते धोतर अंगावरून लपेटतात.

संघमित्रा–महेंद्रांनी श्रमाने वाढविलेल्या बौद्धधर्माची अनेक देवालये व मठ येथे आहेत. बुद्धाची अनेक स्मारके लंकेत आहेत.

**भारताचा बाग**

सिलोन हा अतिपावसाळी प्रदेश आहे. येथे बरेच महिने सारखा पाऊस पडतो. पाणी फार म्हणून तेथील जमीन नेहमी गवताने आच्छादिलेली असते. बाराही महिने हिरवागार गालीचा देशभर परलेला असतो. या देशात झाडेही फार आहेत. बेटाभोवती दाट वनराईची झालर लावली की काय असे वाटते. झाडे असल्यामुळे ऊन जाणवत नाही. भारतातील कोकणपट्टीप्रमाणेच सिलोनात नारळाची जंगले आहेत. रस्त्याने जातांना बागेतून चालल्यासारखे वाटते. अंतर्गत भागात धानाची शेते, चहा, कॉफी व कॉफीचे मळे आणि दालचिनीची झाडे यांचे वैपुल्य आढळते. डोंगरांच्या उतरणीवर हे बहुतेक मळे आढळतात. वनराईच्या हिरवळीमुळे सिलोनला ‘ हिंदुस्थानचा बाग ’ हे नाव पडले आहे, तर नारळामुळे ‘ नारळाचेआगर ’ असे नाव प्राप्त झाले आहे. चहामुळे ‘ चहाचा बाग ’ असेही सिलोन देशाला म्हणतात.

**लंकेचा कल्पवृक्ष**

समुद्री भाग म्हणून लंकेचे लोक भात व मासे खातात. भाताची पेज यांच्या पिण्यात फार येते. आमटी किंवा फोडणीच्या पातळ पदार्थात येथील लोक सुक्या माशांचे तुकडे घालतात. पण याहीपेक्षा यांच्या संपूर्ण जेवणात खोबऱ्याचा फार उपयोग होतो. सर्वत्र वाढलेले ताड आणि माड हे वृक्ष म्हणजे यांचे जीवनच ! तेलतूप यांसाठी खोबरेल वापरले जाते ! ताज्या नारळाचे पाणी पिण्यात काही औरच मजा येते ! ताड आणि माड हे या लोकांचे कल्पवृक्ष आहेत. तामीळ लोकांनी

अनेक गीते या कल्पवृक्षांवर रचली आहेत. एका गाण्यात ‘पालमायरा’ या ताडाचे आठशे उपयोग वर्णिले आहेत. या झाडाच्या जन्माची मजेशीर कथा आहे. ब्रह्मदेवाने पृथ्वीवर उत्पन्न केलेले वृक्ष लोकांच्या गरजा भागविण्यास असमर्थ होते. म्हणून लोक शंकरास शरण गेले. तेव्हा शिवाने स्वर्गातील कल्पवृक्ष पृथ्वीवर पाठविला. तोच हा पालमायरा होय.

ताड-माड यांच्या निर्मितीसाठी कमालीची अनुकूलता या देशात आहे. पृथ्वीवर या कामी इतकी जमीन याच देशात उपयोगाला आणली असावी ! नारळाचे विविध उपयोग आहेत. दोर, पायपुसे, काथ्या, खोबरे असे कितीतरी पदार्थ बाहेरदेशी पाठवून उत्पन्न काढले व वाढविले जाते.

नारळाचे झाडदेखील फार समंजस ! सुसाट वारा व मुसळधार गारा असल्या तरी नारळ हालत राहील व नारळे टपटप पडतील; पण कुणाच्या अंगावर कधीच पडणार नाहीत ! आजवर माणसांच्या आजूबाजूला नारळे पडल्याची उदाहरणे आहेत; पण कुणाच्या अंगाला नारळ येऊन पडल्यामुळे दुखापत झाल्याचे ऐकिवात नाही. एवढी उंच नारळाची झाडे म्हणजे समुद्री भागाचे एक भूषणच म्हटले पाहिजे !

**चहा–कोको–कॉफी–कोयनेल**

सिलोनमध्ये चहाचा व्यापार फार मोठ्या प्रमाणात चालतो. सुमारे ९–१० लाख एकर जमिनीत नारळाची तर ४–५ लाख एकर जमिनीत चहाची लागवड आहे. परदेशात चहा फार मोठ्या प्रमाणात लंकेतून रवाना होतो. हे प्रमाण सुमारे २५–३० कोटी पौंडांचे दरसालचे आहे.

चहाप्रमाणेच कॉफी व कोकोचीही लागवड फार आहे. कोकोची फळे नारळाएवढी असतात. कधीकधी फळांचे घोस येतात. या फळांतील बियांपासून कोको करतात. चॉकलेट पण कोकोपासूनच होतात. सुपारी, रबर, दालचिनी व कोयनेल यांचीही उपज लंकेत फार आहे. डोंगरांच्या काही भागांत सिंकोनाची झाडे वाढतात. त्यांच्या सालीपासून हिवतापाचे कोयनेल औषधी तयार होते.

दालचिनीच्या बऱ्याच बागा लंकेत आहेत. कोलंबोच्या आसपास त्या जास्त आहेत. पोर्तुगीज डचांनी ही लागवड सुरू केली. आपल्याशिवाय हा व्यापार कोणी करू नये असे कायदेही डचांनी त्या वेळी केले होते. करणाराला फाशी दिले जाई.

**बिनादातांचे बुटके हत्ती**

सिलोनच्या जंगलात हत्ती खूप आहेत. ते कळप करून फिरतात व कधीकधी रेल्वेरस्त्यावर बसून मार्ग अडवितात. आता हे प्रकार कमी झाले आहेत. येथील हत्ती लहान व दंतविहीन असतात. हस्तिदंत मिळण्याची शक्यता नसल्यामुळे हत्ती येथे मारले जात नाहीत. वाघ या देशात नाहीत.

**मोत्यांचे आगर**

सिलोनच्या पश्चिम किनाऱ्यावर तलाईमानारच्या आसपास हंगामाच्या वर्षी लाखो रुपयांचे मोती सापडतात असे म्हणतात. मोत्यांचा हंगाम दर सात वर्षांनी येत असतो. कारण मोत्यांची वाढ होण्यास दीर्घावधी लागतो. होडीतून पाण्यात बुडी मारणारी माणसे मोती काढण्याचे काम करतात. बुडी मारतांना पाण्यातील शेवाळांचा त्रास होऊ नये म्हणून पाणबुडे दगड बांधून घेतात. पूर्वी या पाणबुड्यांना शार्क माशांचा त्रास होऊ नये म्हणून होडीत मांत्रिक नेत असत व मोती काढण्याच्या वेळी मंत्रतंत्र चालत असत. एक पाणबुड्या सुमारे १०० शिपले काढतो. मानारच्या आखातात सुमारे ३०–४० हजार मोती काढले जात असावेत. या मोत्यांच्या पैदाशीमुळे या देशाला 'मोत्यांचे आगर' असेही नाव देण्यात आले आहे.

**रत्नदीप आणि माणिकमंदिर**

'सोन्याची लंका' किंवा 'लंकेत सोन्याच्या विटा' असे आपण म्हणतो. पण तसे अलीकडे काहीच दिसत नाही. येथील लोक उष्णतेमुळे कमी कपडे वापरतात. तरीपण दारिद्र्य बरेच आहे. युरोपियन पद्धतीचे कपडे करणारे देशी-विदेशी व सनातनी गंधवाले लोक बरेच आढळतात. ख्रिस्त्यांचे संस्कार फार ! त्यामुळे सोन्याची जुनी लंका आज

उरलेली नाही. मात्र रत्नांच्या खाणीसाठी हा देश पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. ग्रीकांनी या बेटास 'रत्नदीप' असे नाव दिले असून 'रामायणचंपू'त या देशाला 'माणिक-मंदिर' म्हटले आहे. रत्नपूर नावाच्या शहरात पूर्वी रत्नांचा व्यापार फार चालत असे. रत्नपूर नावही त्या व्यापारामुळेच पडले. सर सॅम्युअल हूड हे सव्वाशे वर्षांपूर्वी लंकेत गेले. त्यांनी रत्नप्रदेशातून पोतेभर खडे आणले. त्यांतून त्यांना नंतर ५-६ रत्ने गवसली !

माणिक, इंद्रनीळ पुष्कराज आदि रत्नांच्या व माणकांच्या सुमारे चारपाचशे खाणी या देशात असाव्यात. तरीपण, रत्नांचा व्यापार फारसा परवडणारा नाही, असे म्हणतात.

* * * * *

## २६ गळती कुचंबणा

'गळती कुचंबणा' म्हटली म्हणजे बऱ्याच प्राथमिक शिक्षकांच्या अंगास काटे येतात. सर्व तक्त्यांमध्ये किचकट तक्ता 'गळती कुचंबणे'चाच असतो असा सर्वसाधारण समज होऊन बसलेला आहे. परंतु हा समज म्हणावा तितका खरा नाही.

'गळती कुचंबणे'चा तक्ता मुळात अत्यंत सरल आहे. मग सर्वच शिक्षक त्याला घाबरतात, ते का ? ह्या प्रश्नाचे उत्तर देतांना खेदाने म्हणावे लागते की, 'गळती कुचंबणे'चा तक्ता हा अत्यंत चुकीचा आहे. तक्ता काढणाराने हा तक्ता जेव्हा काढला, तेव्हापासून त्यातील चुका आजतागायत जशाच्या तशा कायम आहेत. ह्या चुकांवर समंजस शिक्षकांनी आजवर विचार करायला हवा होता. परंतु पूर्वानुगामी मनोवृत्तीतून आजवर शिक्षकवर्गास रुळवीत आणलेल्या तत्कालीन शासनप्रणालीला अनुसरून शिक्षकवर्गाचे लक्ष तिकडे गेले नाही. गेले असेलही, तरी कुणी बोलले नाही. स्कूल इन्स्पेक्टर लोकांचे लक्ष या गोष्टीकडे गेले नाही. तुरळक प्रयत्न कदाचित चर्चेतून झाले असतील; परंतु त्यांच्यात एकवाक्यता होण्याची शक्यता फार कमी !

ह्या तक्त्यामधील पुढे दिलेल्या चुका बघितल्या तर त्यांवरून एक फार मोठी घातक बाब या तक्त्यात लपून असल्याचे निदर्शनास

येईल. साक्षरतेचे आमचे जे वास्तव प्रमाण आहे, ते या तक्त्यात कमी दाखविले जाते. त्यापेक्षा ते काही टक्क्यांनी खात्रीने जास्त असू शकते. कदाचित, असे करण्यात आजचे साक्षरतेचे प्रमाण कमी दाखवून आम्ही अधिकांश लोक अडाणी असल्यामुळे स्वराज्य मागण्यास लायक नाही असे दाखविण्याचा परकीय सत्ताधीशांचा त्यावेळी कुटिल डावही असेल !

असो काही ते ! परंतु हा तक्ता आमूलाग्र बदलविला गेला पाहिजे किंवा काढून तरी टाकला पाहिजे. वरून हुकूम लिहून आले तसे वागण्याचा सराव शिक्षकांना झाला आहे. तो अशा सदोष बाबतीत अयोग्यच ठरेल. शिक्षणाधिकाऱ्यांनीही अशा गोष्टींकडे लक्ष पुरविले पाहिजे. या तक्त्याचे स्वरूप पूर्णतः निर्दोष झाले तरच तो अमलात राहण्यात काही अर्थ आहे. स्वतंत्र देशात सदोष बाबींना थारा देण्याची प्रवृत्ती असणे अनिष्टच !

'गळती कुचंबणे'च्या तक्त्यात असलेले दोष पुढे शंकात्मक रीतीने दिलेले आहेत. ते दोष कसे काढता येतील ह्यावर विचारी शिक्षणाधिकारी वर्ग, शिक्षणप्रेमी जन आणि शिक्षक विचार करतील अशी आशा आहे. या तक्त्यात सुधारणा कशा कराव्यात या दृष्टीनेही विचारास चालना मिळू शकेल.

१) या तक्त्यात चार वर्षांचा हिशेब असतो. समजा एक विद्यार्थी १९४७ साली पहिलीत भरती झाला. त्याचा हिशेब तक्त्यात १९५१ साली येईल. परंतु सदर्रू विद्यार्थी जर १९५१ साली चौथा वर्ग उत्तीर्ण न होता १९५२ ला उत्तीर्ण झाला तर त्याचा हिशेब १९५२ च्या तक्त्यात येऊ शकणार नाही. कारण बावन साली फक्त १९४८ साली भरती झालेल्या तुकडीतील मुलांचाच हिशेब राहील. १९५१ च्या तक्त्यात वरील मुलाची 'कुचंबणा' दाखविली जाईल; पण १९५२ साली उत्तीर्ण होऊनही त्याचा हिशेब १९५२ च्या तक्त्यात येणार नाही. हा मुलगा उत्तीर्ण होऊनही साक्षरतेची वाढ झाल्याचे हा तक्तादर्शवीत नाही. ही वाढ दाखविण्याची किंवा अशा मुलांचा हिशेब घेण्याची कोणतीच सोय या तक्त्यात नाही !

२) एक मुलगा १९४६ साली पहिलीत दाखल झाला. तो त्या वर्गात पहिल्या वर्षी अनुत्तीर्ण झाला. नंतर १९४७ च्या पहिलीच्या तुकडीबरोबर उत्तीर्ण होत जाऊन तो १९५१ साली चौथा वर्ग उत्तीर्ण झाला. परंतु १९५१ सालच्या 'गळती कुचंबणे'त १९४७ साली भरती झालेल्या विद्यार्थ्यांचाच हिशेब दाखविण्याची व्यवस्था असल्यामुळे वरील मुलगा उत्तीर्ण होऊनही एक्कावनच्या तक्त्याला त्याच्या प्रगतीचे सोयर-सुतक लागायचे नाही ! येथेही साक्षरतेच्या प्रमाणवाढीत घटच नाही का येणार ?

यावर कोणी सुचवितील की, चार वर्षांत प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अमुक इतके श्रम वा अवधी जास्त लागल्याचा खुलासेवजा उल्लेख करण्याची व्यवस्था तक्त्यात व्हावी. १९४७ ला पहिलीत भरती झालेला विद्यार्थी १९५२ साली उत्तीर्ण झाला तर त्याच्यासाठी एक वर्षाचे अधिक श्रम वा अवधी लागल्याचा खुलासा वरील व्यवस्थेमुळे होऊ शकेल हे खरे; परंतु १९४७ चा हिशेब १९५१ लाच पूर्ण होऊन गेलेला राहील. या विद्यार्थ्यांच्या बाबतीत झालेली 'कुचंबणा' नंतर भरून निघाली तरी १९४७ ला आरंभ होणाऱ्या हिशेबाच्या तक्त्यात पुन्हा तिची नोंद थोडीच करता येईल ?

३) एक मुलगा १९४७ साली पहिलीत भरती होतो. तो तिसरीत गेल्यावर शाळा सोडून दोन वर्षे रिकामा राहतो. त्यानंतर तो तिसरीत त्याच शाळेत भरती होतो व कोठेच अनुत्तीर्ण न होता १९५३ साली चौथी उत्तीर्ण होतो. त्याच्यासाठी श्रम वाया जात नाहीत. सरकारचा कोणताही व्यय त्याच्यावर होत नाही. 'कुचंबणा' पण होत नाही. 'गळती' तेवढी होते. पण त्याच्या प्रगतीचा हिशेब येण्यासाठी जागाच नाही. त्याचा हिशेब १९५१ च्या तुकडीबरोबर 'गळती'च्या सदरात येऊन गेलेला राहील. पण काही व्ययादि भानगडी नसतांना १९५३ साली उत्तीर्ण होऊनही त्याच्या प्रगतीचे प्रमाण एकंदर साक्षरता-प्रमाणवाढीत येत नाही. हे प्रमाण अर्थात सर्वसाधारण प्रमाणात घटच नाही का दाखवीत ?

४) एका वर्षात दोन वर्गांच्या परीक्षा देऊन उत्तीर्ण होत

गेलेली मुले दोनच वर्षांत चार वर्ग उत्तीर्ण होऊन जातात. अशा तऱ्हेचा मुलगा १९४७ साली पहिलीत दाखल झाला. आणि दोनच वर्षांनी चौथी उत्तीर्ण झाला. त्यानंतर त्याने शाळा सोडली. मग त्याला 'गळती'त घालावे काय ? ते कितपत योग्य होईल ? त्याच्या हिशेबाची प्रस्तुत तक्त्यात काय सोय आहे? १९४७ च्या तुकडीचा हिशेब १९५१ ला पूर्ण होईल. तेव्हा दोनदा परीक्षा देऊन आधीच चौथी उत्तीर्ण होऊन गेल्याची मुलाची प्रगती कशा तऱ्हेच्या हिशेबाने दाखविली जाऊ शकेल ? 'गळती कुचंबणे'चा तक्ता या संदर्भात असमर्थ आहे. याचा अर्थ त्या मुलाची 'गळती' झाली असा होतो. साक्षरतेचे प्रमाण त्याच्यामुळे काहीच वाढले नाही, असा या तक्त्यातील सदहू दोषामुळे अर्थ फलित होतो.

५) एक मुलगा पहिलीदुसरीचा अभ्यास घरीच करतो व एकदम तिसऱ्या वर्गात शाळेमध्ये दाखल होतो. तो दोनच वर्षांनी चौथी उत्तीर्ण होतो. समजा असा एक विद्यार्थी १९५१ साली उत्तीर्ण झाला. परंतु १९५१ ला पूर्ण होणाऱ्या 'गळती कुचंबणे'च्या हिशेबात त्या मुलाचा संबध कोठेच येत नाही. कारण १९५१ चा हिशेब हा १९४७ साली भरती झालेल्या तुकडीचा असतो. अशा स्वरूपाच्या मुलांच्या प्रगतीचे प्रमाण वाढतच नाही असे समजायचे काय ? प्रस्तुत तक्ता ही वाढ दाखविण्यास असमर्थ आहे.

६) खाजगीरीत्या अभ्यास करणारा एक मुलगा शाळेत न जाता चौथीच्या परीक्षेला बसून १९५१ साली उत्तीर्ण झाला. त्याचा हिशेब १९५१ ला तयार होणाऱ्या तक्त्यात येणे शक्य नाही. मग, त्याची प्रगती होऊनही, साक्षरतेचे प्रमाण धडधडीत वाढले असूनही, ते वाढलेच नाही असे समजावे की काय ? हा तक्ता अशा मुलांच्या बाबतीत मूग गिळूनच बसतो.

७) एक मुलगा १९४७ साली अकोल्याच्या शाळेत पहिलीमध्ये भरती झाला. १९४८ साली तो यवतमाळला शिकायला गेला. कोठेही 'गळती' वा 'कुचंबणा' न होता तो १९५१ साली यवतमाळला चौथी उत्तीर्ण झाला. परंतु, तरीही यवतमाळच्या शाळेतील 'गळती कुचंबणे'च्या तक्त्यात

मराठी ... ठाणे
क्र. १.५११६

ह्या मुलाचे नावनिशाण राहणे शक्य नाही. कारण १९५१ ला चौथी उत्तीर्ण होणारी तुकडी यवतमाळला १९४७ साली भरती झालेली असणार! अकोल्याचा वरील मुलगा त्याच तुकडीबरोबर पहिलीत भरती झाला, पण अकोल्याला! अकोल्यास १९५१ साली पूर्ण होणाऱ्या हिशेबातही हा मुलगा येत नाही आणि यवतमाळलाही येत नाही. मात्र तो नियमाने चारच वर्षांत चौथी उत्तीर्ण होतो. अशा मुलांचा हिशेब येण्याची व्यवस्था सदर तक्त्यात कोठे आहे?

या बाबतीत दोन्ही शाळांनी परस्परांना कळविले व तशा तऱ्हेचा नियमच केला तर ही अडचण निभावणे शक्य आहे. मात्र शिक्षण खात्यामार्फतीने कसोशीने त्याचे पालन व्हावयास हवे ?

वर्धा येथील बुनियादी प्रशिक्षण विद्यालयात (नॉर्मस्कूलमध्ये) १९५१ साली शिकत असतांना आमच्या मित्रमंडळीत वरी चर्चा झाली आणि वरील शंका आमच्यापुढे उभ्या राहिल्या. त्यांची समर्पक व योग्य उत्तरे मिळाली आणि त्या अनुरोधाने उक्त तक्त्यात सुधारणा घडून आल्या तर, 'गळती कुचंबणा' जी अनेक शिक्षकांची पदोपदी कुचंबणा करते अशी ओरड आहे, ती खात्रीने कमी होईल असे वाटते. ह्या सुधारणा शक्य नसल्यास हा तक्ता आहे त्या स्वरूपात अमलात आणण्यात काहीच अर्थ नाही!

* * * * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमुद्र
अनुक्रम ८५७३८ वि: निबंध
क्रमांक २०८८ नों दि: २०।३।८७

# भाऊ मांडवकर : प्रकाशित वाङ्मय

**कथा**

१ मेंगी

२ कानचिरी

**कादंबरी**

३ माझी चाळीस भावंडं

४ वंचना

५ काय गुन्हा केला ?

**काव्य**

६ पानोळ्या

७ दिव्य प्रात:स्मरण

८ नव्हाळी (संपादित)

**चरित्र व आठवणी**

९ संत तुकडोजी

१० राष्ट्रसंतकी जीवनझांकी

११ राष्ट्रसंताच्या आठवणी भा. १

१२ राष्ट्रसंताच्या आठवणी भा. २

१३ आर्वीच्या संत मायबाई

१४ संत नामदेव दर्शन

**प्रबंध, प्रवास व लेखसंग्रह**

१५ दक्षिणदर्शन

१६ कोलाम (विद्यापीठ अनुदान मंडळ दिल्ली व महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ यांनी पुरस्कार दिलेला प्रबंध)

१७ गळती कुचंबणा

१८ अगस्त्याचे संस्कृतिकेंद्र

१९ मंदिरमाला मुक्तागिरी (महाराष्ट्र राज्याचा प्रथम क्रमांकाचा साहित्य पुरस्कारप्राप्त)

**बालवाङ्मय**

२० करवंदे

२१ रानबोरे

२२ प्रश्नपत्रिका सोडविली !

**प्रौढसाक्षरवाङ्मय**

२३ धोंडू

नवे चरित्र

प्रत्यक्ष मृत्यूवर मात करणारे श्री. मार्कंडेय ऋषी यांचे मधुर चरित्र व मार्कंडा (जि. चंद्रपूर) क्षेत्राची अभिनव माहिती

# मृत्युंजय मार्कंडेय

लेखक

साहित्यभूषण तु. ना. काटकर

किंमत १ रुपया

सेवा प्रकाशन, अमरावती

REFBK-0015116